# महाराष्ट्र विधानपरिषद
## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२२ / पौष २, १९४४ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |
| **(३)** | **उद्योग मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | |
| **(५)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७१**

---

### राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) * १५६५६ श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अरुण लाड, श्री.जयंत पाटील, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांची १० टक्केपेक्षा अधिक पदे रिक्त असू नये असा नियम असतानाही राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची प्राथमिक विभागातील सुमारे ३२ हजार तर उच्च प्राथमिक विभागातील ३१ हजार पेक्षा जास्त पदे रिक्त असल्याची बाब माहिती अधिकार कायद्याअंतर्गत दिनांक ०२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मराठी आणि उर्दु शाळांमधील प्राथमिक शिक्षकांची भरती न झाल्यामुळे दोन्ही माध्यमांच्या शाळांमध्ये मिळून शिक्षकांच्या १८ हजार ४९ जागा अद्याप रिक्त आहेत तसेच कोकणातील पाच जिल्ह्यांत मराठी माध्यमाची सुमारे पाच हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत व पालघर या आदिवासी जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार ९१६ पदे (पेसा) रिक्त आहेत तसेच मराठी माध्यमाबरोबरच उर्दू, तेलगु, तमिळ, हिंदी आणि गुजराती माध्यमातील शाळांमध्येही पदे रिक्त आहेत, तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याची जबाबदारी असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांची सर्वाधिक तर छावणी मंडळ शाळेच्या शिक्षकांची रिक्त पदांची संख्याही जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण कायद्यातील तरतुदीनुसार बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी प्रत्येकी ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक या नियमानुसार केवळ मराठी शाळांमधील १६ हजार ७४८ जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०११ पासून शिक्षक भरतीवर असलेली बंदी सन २०१२ मध्ये उठविण्यात आली असून गेली १० वर्षे शिक्षक भरती न झाल्याने रिक्त पदांच्या संख्येत लक्षणीय वाढ झालेली असून शिक्षक भरतीसाठी तयार असलेले पवित्र पोर्टल बंद असल्यामुळे शिक्षक भरती प्रक्रीयाच होऊ शकली नाही व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी असलेली पवित्र पोर्टल व्यवस्था अद्ययावत करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव व शिक्षण आयुक्त यांना दिनांक ११ जून, २०२२ रोजी निवेदन पाठवून केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या परिस्थितीचा गैरफायदा घेवून संस्थाचालक व शिक्षण विभागाचे अधिकारी लाखो रूपये घेवून बोगस नियुक्त्यांना मान्यता देवून शालार्थ आयडी प्रदान करीत आहेत, तसेच या शाळा व महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने पवित्र पोर्टल अद्ययावत करुन प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर यांची रिक्त असलेली पदे तातडीने भरण्याबाबत तसेच माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेचा (TET) निकाल घोषित करणे व शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२२ (TAIT) चे आयोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सन २०१९-२० च्या संचमान्यतेनुसार प्राथमिक शाळेतील शिक्षकांची सुमारे ३७,०८४ पदे रिक्त तर शिक्षकेतर कर्मचारी यांची २६४४ इतकी पदे रिक्त आहेत. तसेच पेसा क्षेत्रातील एकूण ४८४९ पदे रिक्त आहेत. कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर जिल्ह्यात एकूण १९,८१४ पदे मंजूर असून, त्यापैकी, २८५२ पदे रिक्त आहेत. यापैकी पालघर जिल्ह्यात प्राथमिक शिक्षकांची एकूण १०४७ पदे रिक्त आहेत. तसेच अल्पसंख्यांक शाळेत ३५९५ पदे रिक्त आहेत.
(३) होय, हे खरे आहे.
(४) अभिलेखाची तपासणी केली असता, सदर निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(५) हे खरे नाही.
(६) कोविड-१९ या आजारामुळे राज्यातील विविध विभागांतर्गत पदभरतीस असलेल्या बंदीस वित्त विभागाने शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये शिथिलता दिली आहे. यास्तव राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर रिक्त पदे भरण्यास वित्त विभागाची मान्यता घेण्यात येत आहे. डिसेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) नुसार उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. तसेच शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांची शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चे आयोजन फेब्रुवारी २०२३ मध्ये आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्यात येणार आहे.

तसेच पवित्र पोर्टलमार्फत करण्यात येणाऱ्या भरतीबाबत दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यपध्दती सुधारित करण्यात आली आहे.

-----------------

## जिल्हा परिषदेच्या कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय रद्द करण्याबाबत.

**(२) * १५९९५ श्री.किरण सरनाईक, श्री.महादेव जानकर, श्री.सचिन अहिर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.किशोर दराडे, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.कपिल पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अंबादास दानवे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने (शालेय शिक्षण विभाग) यू-डीयस २०२१-२२ नुसार, शून्य ते २० विद्यार्थी पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करुन त्या शाळांचे शेजारच्या शाळेत समायोजन करण्याबाबतची कार्यवाही सुरु केली असून शासनाने तसा शासन निर्णय निर्गमित केला असल्याचे दिनांक २४ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास पटसंख्येअभावी रत्नागिरी जिल्ह्यातील सुमारे १३४५ शाळा बंद पडणार आहेत तर दरेवाडी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील ८३ पटसंख्या असलेली शाळा बंद केल्यामुळे ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२२ रोजी आंदोलन केले आहे तसेच पटसंख्येअभावी प्राथमिक शाळांची संख्या कमी झाल्याने महाराष्ट्राची ५ व्या क्रमांकावर घसरण झालेली आहे तसेच २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांची संख्या १४९८५ एवढी असून त्यातील १ लाख ५० हजार विद्यार्थी हे दुर्गम ग्रामीण भागातील तसेच आदिवासी बहूल, नक्षलप्रभावी दुर्गम क्षेत्रातील आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात ग्रामीण व डोंगराळ अतिग्रामीण, तांडे वस्ती, आदिवासी पाडे या भागात शाळांमधून गरीब शेतकरी, शेतमजुर, भटके-विमुक्त, ओबीसी,आदिवासी, कष्टकरी व ऊस तोड कामगारांच्या सामान्य कुटुंबातील मुले शिक्षण घेत असल्याने तसेच खाजगी शाळांमधील शुल्क परवडणारे नसल्याने उपरोक्त निर्णयामुळे मुले विशेषतः मुली शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, वय वर्षे ६ ते १४ या वयोगटातील मुलांना शिक्षण हक्क कायद्यानुसार मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची तरतूद असल्याने व राज्यातील शाळा बंद करु नये अशी मागणी राज्यातील विविध शिक्षक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार कमी पटसंख्या असलेल्या शाळांतील शैक्षणिक दर्जा सुधारुन ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा अधिकार मिळण्याकरीता सदर निर्णय रद्द करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे नाही. तथापि, दरेवाडी, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथील ४३ विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी केलेली तात्पुरती व्यवस्था कायमस्वरुपी सुरु ठेवावी, याकरीता दिनांक ११/१०/२०२२ रोजी ग्रामस्थ व विद्यार्थी यांनी आंदोलन केले आहे. तसेच भारत सरकारच्या Performance Grading Index (PGI) मध्ये राज्य देशात प्रथम क्रमांकावर आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) अंशत: खरे आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाटूर फाटा (जि.जालना) ते चारठाणा (जि.परभणी) या रस्त्याच्या कामाच्या निविदेतील गैरप्रकाराबाबत

**(३) * १५९४९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३८३९ ला दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील वाटूर फाटा ते परभणी जिल्ह्यातील चारठाणा या दरम्यानच्या २७ कि.मी. अंतराच्या सिमेंट रस्त्याच्या कामाची रुपये २४८ कोटी एवढी किंमत असतानाही कंत्राटदाराने सुमारे ३९ टक्के कमी दराने निविदा भरुन हे काम १५१ कोटी रूपयांत घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील प्रकरणी संशयास्पद व्यवहार तसेच कामाची गुणवत्ता, दर्जा याबाबत संशय निर्माण झाला असून भविष्यात होणाऱ्या अडचणी लक्षात घेता या निविदा प्रकाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मा.जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे नोव्हेंबर, २०२२ दरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, वरील प्रकरणी जिल्हाधिकारी स्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) जालना जिल्ह्यातील वाटुर फाटा ते चारठाणा या २७ कि.मी. अंतराच्या सिमेंट रस्त्याच्या कामाची एकूण प्रकल्पाची किंमत रुपये २२८ कोटी एवढी आहे व रुपये १८१.६६ कोटी किंमतीची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. कंत्राटदाराने ही निविदा ३९.४५% कमी दराने भरुन सदरील कंत्राटदारास रुपये ११० कोटी मध्ये काम मंजूर करण्यात आले आहे.

(२) निविदा प्रकरणाची चौकशी विषयी कोणतेही निवेदन या विभागास प्राप्त झाले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांना मान्यता देण्याबाबत

**(४) * १५५२७ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४३०७ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २००३-०४ ते २०१८-१९ मधील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील वाढीव पदांबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची व दीर्घ कालावधीपासून प्रलंबित समस्या निकाली काढण्याची मागणी शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक १६ एप्रिल, २०२२, १२ मे, २०२२, २८ मे, २०२२ व ९ जून, २०२२ रोजी अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना निवेदन पाठवून केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दरवर्षी कार्यभार वाढल्यामुळे निर्माण होणारे वाढीव पद मंजूर करण्याबाबतचा वाढीव पदांचा प्रस्ताव तसेच व्यपगत झालेल्या वाढीव पदांना पुन्हा मान्यता देण्याबाबत सर्व तपासण्या करुन शासनास सादर झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) राज्यातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळांमधील व्यपगत करण्यात आलेल्या पदांपैकी २१४ पदे पुनरुज्जीवीत करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.उर्वरीत वाढीव पदांबाबत उच्चस्तरीय समितीसमोर सादर करावयाच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किनखेड (जि.अकोला) येथील पूर्णा नदीवरील ब्रिटिशकालीन पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(५) * १६०५६ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनखेड (जि.अकोला) येथील नदीवरील ब्रिटिशकालीन पुलाला तडे गेल्याने वाहतूक बंद करण्यात आली असल्यामुळे पूर्णा येथील पोलीस पाटील गजानन भानुदास इंगळे यांना अकोला येथे उपचारासाठी नेता न आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २९ ऑक्टोबर, २०२२ रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नादुरुस्त पुलाची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक जनतेकडून वेळोवेळी पाठपुरावा करुनही स्थानिक प्रशासनाकडून दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूल बंद असल्याने याबाबत पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त पूल दुरुस्त करण्याबाबत तसेच पूल बंद असल्याने पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

सदर पुलावरील वाहतूक बंद करण्यात आली आहे. परंतु त्यामुळे पूर्णा येथील पोलीस पाटील श्री.इंगळे यांना उपचारासाठी नेता न आल्याने त्यांचा मृत्यू झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही.
(२) हे खरे नाही.

या पुलाला पर्यायी पूल बनविण्याचे काम पूर्ण झाले असून काही भागाचे भूसंपादन न झाल्याने फक्त ३०० मीटर पोचमार्गाचे काम प्रलंबित आहे. सदर पुलाचे पोचमार्ग पूर्ण झाल्यानंतर त्यावरुन त्वरीत वाहतूक सुरु होईल.
(३) हे खरे नाही.

सदर पूल वाहतुकीकरीता बंद असल्याने जिल्हादंडाधिकारी, अकोला यांच्या दिनांक १८/१०/२०२२ च्या आदेशान्वये पर्यायी व्यवस्था म्हणून (१) अकोला–म्हैसांग–दर्यापूर-अकोट मार्गाने व (२) अकोला-म्हैसांग-दहिहंडा-अकोट मार्गाने वाहतूक वळविण्यात आली आहे.
(४) संरचना सल्लागार यांनी पुलाची पाहणी करुन अस्तित्वातील पुलाच्या वरच्या बाजूला रपटा बांधून व त्यावरुन वाहतूक वळवून क्षतिग्रस्त पुलाचे दुरुस्ती करण्याचा प्रस्ताव दिला आहे. त्यानुसार रपटा (Raised Cause Way) चे अंदाजपत्रक केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार (MoRTH) यांचेकडे मंजुरी स्तरावर आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिवाळी आनंद शिधा योजनेच्या निविदेमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(६) * १६११६ श्री.अंबादास दानवे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिवाळी निमित्त सामान्य जनतेसाठी "दिवाळी आनंद शिधा योजना " जाहीर केली आहे तसेच या योजनेंतर्गत राज्यातील ६ लाख केशरी व पिवळया शिधापत्रिका धारकांना धान्याचा पुरवठा करण्यात येणार असून राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीपूर्वीच याबाबत रुपये ५१३ कोटी २४ लाख रुपयांची निविदा काढण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिवाळीनिमित्त फूड किट (चना डाळ,रवा, साखर व पामतेल) पुरवठा करण्याबाबत (NCDEX Emarkets limited) दिनांक १ ऑक्टोबर, २०२२ रोजी परिपत्रक काढून प्रसिध्द करण्यात आले आहे परंतु त्या कंपनीवर गुन्हे दाखल असून सदर कंपनी काळया यादीत असल्याचेही निदर्शनास आले आहे तसेच दिवाळीनिमित्त नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या किटची बाजारातील मूल्य हे रुपये २४० एवढे असून सदरहू कंपनीने उक्त किटचा रुपये २८० या वाढीव दराने पुरवठा केला असूनही अद्यापही उक्त किट हे नागरीकांपर्यंत पोहोचलेच नाही, तसेच शिधावाटप दुकानदार

या वस्तू महागड्या दराने म्हणजे ३०० रुपये घेऊन विकत असल्यामुळे नागरिकांची फसवणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाच्या निकषाप्रमाणे निविदा प्रक्रिया न राबविता संबंधित विभागाचे अधिकारी यांनी मनमानी करुन उक्त कंपनीला कंत्राट दिल्याने निविदेच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याची लेखी तक्रार मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी मा.मुख्यमंत्री. मा.उप मुख्यमंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भंडारा शहरात ही किट उपलब्ध असून ग्रामीण भागात दिवाळीनंतरही उपलब्ध नसल्याने गरीब, कष्टकरी व श्रमिक लोकांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने अन्न व नागरी पुरवठा विभागाने दिवाळीनिमित्त फूड किट पुरवठा करण्याबाबत काढण्यात आलेली निविदा रद्द करुन संबंधित दोषी अधिकारी व पुरवठा करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच केंद्र सरकारच्या प्रमाणे DBT पध्दतीने लाभार्थीला त्यांच्या बँक खात्यामध्ये पैसे जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) दिनांक २७/०९/२०२२ रोजी मा.मंत्रिमंडळ बैठकीमध्ये झालेल्या चर्चेदरम्यान राज्यातील पात्र शिधापत्रिकाधारकांना आगामी दिवाळी सणानिमित्त शासनाकडून सवलतीच्या दरात अतिरिक्त शिधाजिन्नस (दिवाळी पॅकेज) देण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुषंगाने दिनांक १२/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील Online Platform वापराच्या तरतूदीनुसार दिवाळी सणानिमित्त नियमित अन्नधान्याव्यतिरिक्त रवा, चणाडाळ, साखर व पामतेल हे शिधाजिन्नस उपलब्ध करुन देण्याकरीता NeML NCDEX Group of Company यांच्या मार्फत निविदा प्रक्रीया राबविण्यात आली. सदर निविदा प्रक्रीयेस दिनांक ०४/१०/२०२२ च्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली असून राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब व तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व जिल्हे व नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांतील एपीएल (केशरी) शेतकरी शिधापत्रिकाधारकांना दिवाळी सणानिमित्त “आनंदाचा शिधा” देण्याचा निर्णय दिनांक ०४/१०/२०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.
(२) अंशत: खरे आहे. विभागाच्या दिनांक १२/०९/२०१७ च्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अनुषंगाने प्रचलित कार्यपध्दतीनुसार शिधाजिन्नस संचांची खरेदी करण्यात आली असून त्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता घेण्यात आली आहे. सदर निविदाप्रक्रीयेत ६ निविदाकार सहभागी झाले असून स्पर्धात्मक निविदाप्रक्रीया पार पडली आहे.

क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या अहवालांनुसार पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी ९६ टक्के शिधापत्रिकाधारकांनी शिधाजिन्नस संचांचा लाभ घेतला आहे. शिधाजिन्नस संचांचे वितरण महाग दराने केल्यामुळे जिल्हा-ठाणे येथे संबंधित दुकानदारावर जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, जिल्हा-जळगांव येथे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार संबंधित दुकानदारास नोटीस बजावण्यात आली आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्याकडून दिनांक ०६/१०/२०२२ च्या पत्रान्वये निवेदन प्राप्त झाले, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
(५) प्रस्तुत प्रकरणी दिनांक १२/०९/२०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार निविदाप्रक्रीया पार पडली असून चौकशीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याऐवजी DBT द्वारे रोख रक्कम देण्याबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय शासनाने अद्याप घेतलेला नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील बी.ए. च्या अभ्यासक्रमातून महानुभाव पंथाचा अभ्यासक्रम वगळण्यात आल्याबाबत

**(७) * १५५०६ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मानवशास्त्र विद्याशाखा अंतर्गत बी. ए. च्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या सेमिस्टरमध्ये महानुभाव पंथाचा अभ्यासक्रम वगळण्यात आल्याने महानुभाव पंथांच्या नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त होत असल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठी साहित्य व पदव्युत्तर मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमात गेल्या ५० वर्षांपासून सातत्याने महानुभाव पंथावर आधारित आत्मचरित्र, वाङमयीन प्रकार, कादंबरी अशा वेगवेगळ्या संदर्भात महानुभाव पंथावरील चरित्र ग्रंथ व वाङमयीन इतिहासावर आधारित सुरू असलेला अभ्यासक्रम बदलण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बी.ए. अभ्यासक्रमातून महानुभावाचे स्वतंत्र साहित्य वगळू नये अशी विनंती नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी कुलगुरु, नागपूर विद्यापीठ यांचेकडे केली असून आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मराठी साहित्याच्या मूळ असलेल्या महानुभाव पंथाच्या अभ्यासक्रमाला वगळणे म्हणजे बहुजन समाजाच्या इतिहासाला वगळणे असे असून यावर चौकशी नेमुन महानुभाव पंथाच्या इतिहासावरील अभ्यासक्रमांना पुन्हा सामावून घेण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

बी.ए. तृतीय वर्षाच्या सत्र सहाच्या घटक तीनमध्ये "प्राचीन वाड.मयाचा इतिहास" या ग्रंथातील "महानुभावाची साहित्यसरिता" हे प्रकरण मराठी साहित्यात समाविष्ट आहे. तसेच, मराठी अनिवार्य या विषयामध्ये बी.ए. च्या सत्र एक मध्ये "पाखाला बालक पांगुरवणे" (म्हाइंभट) आणि सत्र तीनमध्ये "हत्तीचा दृष्टांत" (दृष्टांतपाठ) केशिराजबा ही प्रकरणे अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

(२) हे खरे नाही.

पाठ्यक्रमात महानुभावपंथावर आधारित साहित्य अभ्यासक्रमात अंतर्भुत आहेत. एम.ए. भाग-१ ला प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास हा पेपर आहे. यात महानुभावपंथाचा अभ्यास येतो. एम.ए.भाग-२ ला प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक गद्य हा पेपर असून, यातील घटक-२ मध्ये लिळाचरित्र (सं.डॉ.श.गो.तुळपुळे) या महानुभावपंथाच्या ग्रंथाचा समावेश केलेला आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) अभ्यासक्रमात बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाच्या अभ्यासमंडळ व विद्यापरिषद या प्राधिकरणांना असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील अभ्यासमंडळाचा व विद्यापरिषदेचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. नविन अभ्यासमंडळ आणि विद्यापरिषद गठीत होताच सदर लोकप्रतिनिधी व इतरांनी सादर केलेली पत्रे विद्यापीठाकडून अभ्यासमंडळाच्या सभेत सादर करण्यात येतील.

-----------------

## मुंबईतील सेवानिवृत्त शिक्षकांना डीसीपीएसची अंतिम देय रक्कम मिळाली नसल्याबाबत

**(८) * १५१५६ श्री.कपिल पाटील : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ११ मधील प्रश्न क्रमांक ५०२२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिक्षकांना सेवानिवृत्तीनंतर पाच ते सहा वर्षे होऊनही अंतिम देय असलेली डीसीपीएसची रक्कम अद्यापी अदा करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदर डीसीपीएसची रक्कम व्याजासह देणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

कोविड-१९ प्रादूर्भावामुळे प्रकरणे शाळास्तरावरुन उशिरा प्राप्त झाली. प्राप्त प्रकरणांचा विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई स्तरावरुन कार्यवाही होते. सदर कार्यालयात प्राप्त ९४ प्रकरणांपैकी ६६ प्रकरणी रक्कम अदा करण्यात आलेली असून ७ प्रकरणे कोषागारात सादर करण्यात आली आहेत व २० प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना पूर्ववत लागू करण्याबाबत

**(९) * १५६६९ डॉ.रणजित पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनमान्य शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवा महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७/१९७८ व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील तरतुदींच्या अधीन नियमावली मधील नियम क्र. १९ व २०(२) अन्वये निवृत्तीवेतन व भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ देय आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक १९ अन्वये सेवानिवृत्तीवेतन योजनेचा व नियम क्रमांक २०(२) अन्वये भविष्य निर्वाह निधी योजनेचा लाभ खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देय असून सदर सेवानिवृत्तीवेतन योजनेच्या लाभापासून वंचित करणारा असंवैधानिक शासन निर्णय शासनाने दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० रोजी निर्गमित केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालयातील १०० % अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी परिभाषित अंशदान निवृत्तीयोजनेच्या अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबतचा शासन निर्णय तात्काळ रद्द घोषित करुन खाजगी शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू करण्याबाबत म.रा.शि.प. व इतर विविध शिक्षक संघटनांनी शासनास दिनांक ११/१२/२०२०, २२/१२/२०२० व २७/१२/२०२० रोजी निवेदने दिली आहेत तसेच नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक २१/८/२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदन देऊन दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास उपोषण, धरणे आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान व अंशत: अनुदान परंतु, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर १००% अनुदानावर आलेल्या शाळेतील शिक्षकांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला व दिनांक २४/०७/२०२१ अन्वये शासनाने अभ्यास करण्यासाठी संयुक्त समिती गठीत केली असून सदर समितीला ३ महिन्यांचा कालावधी देऊनही अद्याप अहवाल सादर केला नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सर्व अनुदानित, अंशतः अनुदानित व तुकड्यांवर १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत दिनांक १० जुलै २०२० रोजीच्या अधिसूचनेत जारी केलेल्या बदलानुसार अनुदानित शाळांची व्याख्या बदलून लाखो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना मिळण्याचा अधिकार हिरावून घेतला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सर्व अनुदानित, अंशतः अनुदानित व तुकड्यांवर दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी व त्यानंतर नियुक्त झालेल्या सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) वित्त विभागाने दिनांक ३१/१०/२००५ च्या निर्णयान्वये दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. सदर निर्णयानुसार मान्यता प्राप्त व अनुदानित शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही परिभाषित अंशदायी निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजनेची विस्तृत कार्यपध्दती शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक २९/११/२०१० च्या शासन निर्णय अन्वये निश्चित केली आहे.
(३) या अनुषंगाने विविध प्रकारे मागणी करण्यात येत असून मा.लोकप्रतिनिधी व इतर व्यक्तींकडून निवेदने प्राप्त होत आहेत.
(४) हे खरे नाही.

मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांच्या दालनात दिनांक २६/६/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्देशानुसार, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये संयुक्त समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने दिनांक ०३ जुलै, २०२० रोजी अहवाल शासनास सादर केला आहे.
(५) शासन अधिसूचना, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र. अंनियो ३४१७/प्र.क्र.१६९/ टीएनटी-६, दिनांक १० जुलै, २०२० अन्वये महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम, १९८१ मध्ये सुधारणा करण्यासाठी सदर नियम १/११/२००५ पासून समाविष्ट झाल्याचे समजण्यात येईल, असा आहे. या अधिसूचनेवर हरकती व सूचना मागविण्यात आल्या.

या अनुषंगाने अनेक हरकती प्राप्त झाल्या. सबब, उक्त अधिसूचना दिनांक ११ डिसेंबर, २०२० च्या अधिसूचनेद्वारे मागे घेतली आहे.
(६) संयुक्त समितीच्या अहवालातील शिफारस क्र.१ व २ च्या अनुषंगाने आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली "सम्यक विचार समिती" गठीत करण्यात आली आहे. सम्यक विचार समितीने अहवाल सादर केला असून तो विचाराधीन आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षकांना सेवा संरक्षण देणेबाबत

**(१०) * १५८९३ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.नागोराव गाणार, श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या संस्थांमार्फत विनाअनुदानित तत्वावर शाळा व वर्ग तुकड्या सुरू करण्यात आलेल्या आहेत तसेच अंशत: अनुदानित प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेवर कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देण्याबाबत तसेच यापूर्वी अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेवर कार्यरत असणाऱ्या परंतु अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांनासुद्धा सेवा संरक्षण देण्यात न आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सीबीएससी कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती या राज्यातील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्तीप्रमाणे राहतील असा उल्लेख उपनियमामध्ये (बायलॉज) असताना प्रत्यक्षात सीबीएससी शिक्षकांना कोणतेही सेवा संरक्षण दिले जात नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विनाअनुदानित शाळेत ८ ते ९ वर्षे विनावेतन सेवा केल्यानंतर विद्यार्थी संख्येअभावी पद रिक्त झाल्यास त्या पदाला संरक्षण न देता ते पद व्यपगत केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेवर कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व सीबीएससी शिक्षकांना सेवा संरक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील अंशत: अनुदानित रिक्त पदावर वैयक्तिक मान्यताप्राप्त अंशत: अनुदानित शिक्षकांचे अनुदानाच्या समान टप्प्यांवर समायोजनाबाबत शासन निर्णय दिनांक १२/१२/२०२२ रोजी निर्गमित करण्यात आला.

तसेच, सीबीएसई संलग्नित शाळेतील कर्मचाऱ्यांच्या सेवा निर्धारित करणारे नियम तयार करणेबाबत माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयास दिनांक २५/०७/२०२२ रोजी पत्र प्राप्त झाले आहे. त्यावर संचालनालय स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी घोषित केलेले ब्लॅक स्पॉट दूर करण्याबाबत

**(११) * १५७७६ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रस्त्यांवर वारंवार होत असलेले अपघात रोखण्यासाठी घोषित करण्यात आलेले 'ब्लॅक स्पॉट' संबंधित विभागांनी दूर करावेत, असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास झालेल्या रस्ता सुरक्षा आढावा बैठकीत दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील महामार्गांवर ६१० ब्लॅक स्पॉट असून माहे जानेवारी, २०१९ पासून सप्टेंबर, २०२२ अखेर राज्यातील महामार्गांवर ७६१४६ अपघात होऊन ३३६०४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील विविध महामार्गांवरील अपघात प्रवण ठिकाणी दुभाजक, सर्विस रोड, दिशादर्शक फलक, वेग मर्यादा नियंत्रक अशा आवश्यक उपाययोजना अपुऱ्या असून रस्ते अपघातावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील एकूण किती ठिकाणी 'ब्लॅक स्पॉट' घोषित केले आहेत, त्यापैकी किती 'ब्लॅक स्पॉट' अद्याप दूर करण्यात आले आहेत, उर्वरित 'ब्लॅक स्पॉट' किती कालावधीत दूर करण्याचे शासनाचे नियोजन आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी घोषित केलेले ब्लॅक स्पॉट दूर करण्याबाबत तसेच रस्ते अपघातामध्ये जखमींना मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ०६/०९/२०२२ रोजीचे पत्रान्वये राज्यात सन २०१९ ते सन २०२१ या कालावधीत एकूण १००४ ब्लॅक स्पॉट घोषित केले आहेत. यापैकी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील राष्ट्रीय महामार्ग, राज्य व प्रमुख जिल्हा मार्गांवरील एकूण २९५ ब्लॅक स्पॉटची सुधारणा ६ महिन्यांत पूर्ण करणेबाबत दिनांक २०/१०/२०२२ चे शासन पत्रान्वये सूचित केले आहे.
(५) राज्यातील महामार्गावर महामार्ग पोलिसांमार्फत अपघातामध्ये जखमींना तात्काळ वैद्यकीय मदत मिळण्याकरीता "मृत्यूंजय दूत योजना" प्रभावीपणे राबविण्यात येते. अद्यापपावेतो महामार्ग पोलीस विभागात संपूर्ण महाराष्ट्रात एकूण ५३५० हायवे मृत्यूंजय दूत नोंद झालेली आहे. प्रशिक्षणामध्ये अपघातग्रस्त व्यक्तीस कसे हाताळावे याचे प्राधान्याने प्रशिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी नुकतीच जाहीर केलेली स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अपघात योजना याची माहिती सर्व हायवे मृत्यूंजय दूत यांना देण्यात आलेली आहे. हायवे मृत्यूंजय दूत यांचेकडून ६८८ अपघातांमध्ये १२४३ व्यक्तींचे जीव वाचविण्यात आले असल्याचे अपर पोलीस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक ०८/१२/२०२२ चे पत्रान्वये कळविले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर, पुणे येथील महाप्रकल्प अन्य राज्यामध्ये होणार असल्याबाबत

**(१२) * १५१३० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सचिन अहिर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील मिहान परिसरात भारतीय हवाई दलासाठी मालवाहू विमाने तयार करण्याचा रुपये २२ हजार कोटींचा महाप्रकल्प करण्याबाबत एअरबस-टाटा यांनी राज्य शासनामार्फत करण्याचे निश्चित केले होते तसेच वेदांत फॅक्सकॉन या कंपनीच्या प्रकल्पासाठी शासनाने तळेगाव (जि.पुणे) येथील ११०० एकर

जमीन व इतर सोयीसुविधा देण्याचे आश्वासन देऊनही १ लाख ६६ हजार कोटी रुपयांची गुंतवणुक असलेला हा प्रकल्प गुजरातमधील बडोदा येथे होणार असल्याचे दिनांक २७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोन प्रकल्पांसह सुमारे ३० हजार कोटी रुपयांचा बल्क ड्रग पार्क, मेडिकल डिझायनर पार्क, एअर इंडिया, वित्तीय केंद्र तसेच पुणे जिल्ह्यात उभारण्यात येणारा सुमारे दीड लाख कोटी रुपयांचा, दोन लाख निर्मिती क्षमता असलेला व २६ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळवून देणारा सेमीकंडक्टर हा प्रकल्प गुजरातमध्ये होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रत्येक प्रकल्पातून रुपये ३ हजार कोटींची गुंतवणूक व ५० ते ७५ हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार असल्याने लाखो तरुणांना या रोजगारापासून वंचित राहावे लागणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बल्क ड्रग पार्क हा सुमारे ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक असलेल्या औषध निर्मिती प्रकल्पासाठी केंद्र शासनाने महाराष्ट्र वगळून गुजरात, हिमाचल, आंध्र प्रदेश या राज्यांना तत्त्वतः मान्यता दिली असल्याचे दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून वेदांत-फॉक्सकॉन, एअरबस टाटा इत्यादी प्रकल्पांची माहिती देण्यासाठी राज्य शासनातर्फे श्वेतपत्रिका काढण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सदर प्रकल्प राज्याबाहेर जावू नयेत व तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) नागपूर येथील मिहान परिसरात, भारतीय हवाई दलासाठी मालवाहू विमाने तयार करणेसाठी एअरबस-टाटा यांनी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे (MADC) तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळकडे (MIDC) कोणताही लेखी प्रस्ताव सादर केलेला नाही.

वेदांत-फॉक्सकॉन या कंपनीच्या प्रकल्पासाठी आवश्यक त्या सोयीसुविधा राज्य शासनामार्फत देण्यात येतील असे आश्वासन देऊनही सदर वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरात मध्ये होणार असल्याचे दिनांक १३/०९/२०२२ रोजी निदर्शनास आले आहे.

(२) व (३), (४) व (५) (अ) दिनांक ५ जानेवारी, २०२२ रोजी वेदांता-फॉक्सकॉन उद्योग घटकाने राज्यात गुंतवणूक करण्याबाबतचा मानस व्यक्त केला. त्यानुषंगाने दिनांक ११ जानेवारी, २०२२ रोजी राज्य शासनाने वेदांताच्या इराद्याचे स्वागत करुन महाराष्ट्रात गुंतवणूक केल्यास सदर प्रकल्पासाठी सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे तत्वत: मान्य केले. दिनांक १४ व १५ जुलै,२०२२ रोजी मा.मुख्यमंत्री तसेच मा.उप मुख्यमंत्री महोदयांच्या पत्राव्दारे वेदांता उद्योग समुहास राज्य शासनासोबत सामंजस्य करार करण्याबाबत आवाहन करण्यात आले. दिनांक १५ जुलै,२०२२ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची (High Powered Committee) बैठक घेण्यात येऊन, सदर बैठकीत सुमारे ३८,०००/- कोटी रुपये इतक्या मूल्याची भांडवली प्रोत्साहने, जमीन, वीज, पाणी इ. सवलती व इतर प्रोत्साहने वेदांताच्या नियोजित प्रकल्पास देऊ करण्यात आली. तथापि, हा प्रकल्प महाराष्ट्रात उभारण्यासाठी सदर घटकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अथवा राज्य शासनाशी कोणताही सामंजस्य करार केलेला नाही.

(ब) भारतीय हवाई दलासाठी सी-२९५ जातीची मालवाहू विमाने उत्पादित करणारा २२ हजार कोटींचा एअरबस-टाटा प्रकल्प गुजरात मधील बडोदा येथे उभारण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय संरक्षण सचिव यांनी दिल्ली येथे केली होती. तसेच एअर बस सी-२९५ व सॅफ्रॉन या कंपन्यांचा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल झालेला नव्हता.सदर कंपन्यांनी त्यांच्या प्रकल्पांबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी कोणतीही चर्चा अथवा पत्रव्यवहार केलेला नाही.

(क) बल्क ड्रग पार्क व वैद्यकीय उपकरणे निर्मिती पार्क याबाबत केंद्र सरकारच्या अनुदान योजनेंतर्गत महाराष्ट्राने प्रस्ताव दाखल केलेले आहेत. रायगड जिल्यामध्ये बल्क ड्रग पार्क स्थापन करण्याकरीता रुपये १००० कोटी अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १४/०८/२०२० व दिनांक ०७/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात केंद्र शासनाने दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार बल्क ड्रग्स पार्क स्थापन करण्याबाबतच्या अतिरिक्त त्रुटींची माहिती दिनांक ०७/०१/२०२२ रोजीच्या अ.शा.पत्रान्वये केंद्र शासनास कळविण्यात आले आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्रलंबित आहे.

(ड) केंद्र शासनाच्या दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (डीएमआयसी) प्रकल्पातंर्गत महाराष्ट्र राज्यातील औरंगाबाद येथील शेंद्रा बिडकीन येथे ऑरिक हे औद्योगिक शहर वसविण्यात येत आहे. सदर शहरामध्ये मेडिकल डिव्हाईस पार्क स्थापन करण्याचा राज्य शासनाचा मानस असून, सुमारे ३५० एकर क्षेत्रामध्ये सुमारे ४५० कोटी रुपये एवढया अंदाजित खर्चाचे सदर मेडिकल डिव्हाईस पार्क स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाच्या औषध विभाग, रसायन व खते मंत्रालयाकडे दिनांक १४/१०/२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्रंलबित आहे.

वरील नमूद प्रकल्पांसंदर्भात प्रकरणनिहाय सविस्तर माहितीसह श्वेतपत्रिका प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी अशी सूचना विभागाच्या वतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला देण्यात आलेल्या असून, त्याबाबत यथावकाश कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत

**(१३) * १५९१६ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.कपिल पाटील, श्री.राजहंस सिंह, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये शिक्षकांची कमतरता लक्षात घेऊन, रिक्त पदांपैकी ५० टक्के शिक्षकांची व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्यात येतील याशिवाय अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करण्यास प्राधान्य देण्यात येईल असे शासनाने आश्वासन दिले असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविडमुळे दोन वर्षात झालेले शैक्षणिक नुकसान भरून काढण्यासाठी शिक्षकांना सर्व अशैक्षणिक कामातून मुक्त करून अध्यापन करण्यास वेळ द्यावा, शिक्षकांना मुख्यालयाच्या ठिकाणी राहण्याची जाचक अट रद्द करा, शिक्षण विभागातील सर्व रिक्त पदे त्वरीत भरावीत, ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलांना मोफत गणवेश दयावा, मुलींच्या उपस्थिती भत्त्यात १ रूपये ऐवजी १० रूपये वाढ करावी, वस्तीशाळा शिक्षकांना मूळ नियुक्ती दिनांकापासून वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात यावी, आपले गुरूजी मोहिमेअंतर्गत गुरूजींचा फोटो वर्गात लावण्याचा निर्णय मागे घेण्यात यावा, या आणि अन्य मागण्यांसाठी शिक्षक भारती आणि अन्य प्राथमिक शिक्षक संघटनांनी औरंगाबाद येथे विशाल मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांना मतदारसंघातील ओळखपत्राचे वाटप करणे, दिव्यांग मतदारांचा शोध घेणे यांसह इतर बीएलओची कामे दिली जातात तसेच बीएलओच्या कामांसह समग्र शिक्षा अभियानाची कामे पूर्ण करावयाची असून मुंबईच्या बहुतांश शिक्षकांना निवडणूकांची कामे (बीएलओ) दिल्याने शिक्षकांवर कामाचा अतिरिक्त भार येत आहे, तसेच शालेय निकालांसह समग्र शिक्षा अभियानासाठी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना ४४ प्रकारची कामे करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याशिवाय शालेय विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठयपुस्तकांमध्ये वह्यांची जोड देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने शिक्षकांच्या सदर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) होय, हे खरे आहे.

(५) शिक्षकांना अशैक्षणिक काम न देण्याबाबत शासनाने वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत. तथापि, कोविड-१९ महामारीच्या आपत्तीजन्य परिस्थितीत अत्यावश्यक कामासाठी घेण्यात आलेल्या सेवांतून शिक्षकांची कार्यमुक्तता करण्यात आलेली आहे.

वित्त विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३१/१०/२०२२ अन्वये दिलेल्या पदभरती बंदीच्या शिथीलतेस अनुसरुन राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर पदे भरण्यास वित्त विभागाची मान्यता घेण्यात येत आहे. सन २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीनुसार उमेदवारांची शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चे आयोजन आयबीपीएस कंपनीमार्फत करण्यास शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे.

समग्र शिक्षा अंतर्गत मोफत गणवेश वाटप योजनेनुसार शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गातील सर्व मुली व अनुसूचित जाती व जमातीची सर्व मुले आणि दारिद्रय रेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेशाचा लाभ देण्यात येतो.

मुलींच्या उपस्थिती भत्यामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

वस्तीशाळा शिक्षकांना मूळ नियुक्ती दिनांकापासून वरिष्ठ वेतन श्रेणी देण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्याकडून याबाबत येणाऱ्या वित्तीय भाराची माहिती मागविण्यात आली आहे.

आपले गुरुजी मोहिमेअंतर्गत गुरुजींचा फोटो वर्गात लावण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या निर्देशानुसार उपक्रम राबविण्यात येत आहे. तथापि, काही तांत्रिक कारणामुळे सदर उपक्रमाची अंमलबजावणी झाली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यांतील कायम विनाअनुदानित शाळेतील कायम शब्द वगळून प्रचलित धोरणानुसार अनुदान देणेबाबत

**(१४) * १६१३२ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.रणजित पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.किरण सरनाईक, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १४२२६ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कायम शब्द वगळलेल्या अघोषित सर्व शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, व वर्ग तुकड्यांना तत्कालीन आघाडी शासनाने निश्चित केलेले अनुदानाचे प्रचलित धोरण लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००१ नंतरच्या कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द वगळून टप्प्याटप्प्याने अनुदान देणे बाबत नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ डिसेंबर, २०२० रोजी शासनास पत्र पाठवून विनंती केली आहे तसेच कायम शब्द वगळलेल्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्गतुकड्यांवर सुमारे ६५ हजार शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी १७ ते २० वर्षांपासून काम करीत असून या शाळांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी १०० टक्के अनुदान मिळावे व कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांनी मागील माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत घरबैठे धरणे आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात कायम विनाअनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी व नंतर मान्यता देण्यात आलेल्या उच्च शिक्षण विभागातील वरिष्ठ महाविद्यालयांची एकूण संख्या किती व त्यामध्ये कार्यरत शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे तसेच त्रुटी पूर्ण केलेल्या शाळांच्या याद्या जाहीर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणेबाबत शासनाकडून सकारात्मक निर्णय अद्यापही झालेला नाही, तसेच दिनांक १२, १५ व २४ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या शासन निर्णयामध्ये त्रुटी असलेल्या राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व तुकड्यांची त्रुटी पूर्तता झाली असून सदरहू शाळांना व तुकड्यांना अद्याप वेतन अनुदानाकरीता निधी मंजूर झाले नसल्याचेही त्याचदरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गत अधिवेशनात मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी दीड महिन्यांच्या कालावधीत सदर बाबत निर्णय घेऊ असे आश्वासित केले होते, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार, अनुदानासाठी त्रुटी पूर्ण केलेल्या शाळांचा आदेश निर्गमित करणे, अघोषित सर्व शाळा,कनिष्ठ महाविद्यालय व २०१२-१३ च्या वर्ग तुकड्या अनुदानासाठी पात्र म्हणून घोषित करणेबाबतचा शासन निर्णय निर्गमित करणे,यापुढे सर्व शाळांना प्रचलित धोरणांनुसार अनुदान देणेबाबत शासन निर्णय निर्गमित करणेबाबत,शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अनुदान पात्रतेच्या निकषांनुसार पात्र होणाऱ्या अघोषित शाळा व तुकड्यांना अनुदान लागू करण्यात येते.

(२) होय.

(३) राज्यात कायम विना अनुदान धोरण स्वीकारण्यापूर्वी ११०२ व नंतर मान्यता देण्यात आलेल्या २२१६ अशी एकूण ३३१८ वरिष्ठ महाविद्यालये आहेत. सदर महाविद्यालयांत कार्यरत शिक्षकांची अंदाजे संख्या ४२,३७९ आहे.

मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) होय.

(५) आश्वासन पूर्ततेच्या अनुषंगाने आवश्यक प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असून, मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत त्रुटी पुर्तता केलेल्या शाळांना २० टक्के व ४० टक्के तसेच, अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा वर्ग/तुकड्यांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा तसेच, यापूर्वी २० टक्के व ४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईच्या अरबी समुद्रातील शिवस्मारकाचे काम बंद असल्याबाबत

**(१५) * १६०८७ श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१६ मध्ये अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारकाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचे हस्ते जलपूजन करण्यात आल्याचे तसेच प्रकल्पाचे कार्यादेश एल ॲण्ड टी कंपनीला ऑक्टोबर २०१९ मध्ये देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पामुळे पर्यावरणाला धक्का पोहोचणार असल्याचे तसेच मासेमारी व्यवसायाला फटका बसणार असल्याचे नमूद करुन पर्यावरणप्रेमी, मच्छिमार आणि काही सेवाभावी संस्थांनी त्याविरोधात मा.न्यायालयात याचिका दाखल केल्यावर मा.न्यायालयाने त्यावर माहे जानेवारी, २०१९ मध्ये प्रकल्पाचे कामाला स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने प्रकल्पाच्या कामावरील स्थगिती उठविण्याची माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये मा.न्यायालयाकडे प्रतिज्ञापत्राद्वारे मागणी केली असता स्थगिती तातडीने उठविण्यास मा.न्यायालयाने नकार दिल्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु होऊ शकले नसल्याचे शासनाकडून सांगण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रकल्पाचे काम गेल्या तीन वर्षांपासून जैसे थे स्थितीत असल्यामुळे मा.न्यायालयाने दिलेली स्थगिती उठविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे वा त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१६ मध्ये अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारकाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांचे हस्ते जलपूजन करण्यात आले आहे. प्रकल्पाचे कार्यादेश मे. एल. ॲड. टी. लि. यांना दिनांक १४ सप्टेंबर २०१८ रोजी देण्यात आले आहेत.
(२) होय, हे खरे आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुमती याचिकेच्या सुनावणीवेळी दिनांक ११/०१/२०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सद्य:स्थितीत काम बंद आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या दोन विशेष अनुमती याचिका व तद्नंतर दाखल झालेली एक रिट याचिका या तीनही याचिकांच्या दिनांक ०३/०३/२०२० रोजीच्या एकत्रित सुनावणीनंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका निकाली काढून रिट याचिका सुनावणीसाठी मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल मूळ जनहित याचिकांसोबत चालविण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार या सर्व याचिकांचे प्रतिवादी यांच्यातर्फे न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रतिज्ञापत्र मा.उच्च न्यायालयात दिनांक ०५/०८/२०२२ रोजी सादर करण्यात आले असून इतर प्रतिवादींची प्रतिज्ञापत्रेही मा.उच्च न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. मा.उच्च न्यायालयाने सुनावणीची तारीख अद्याप जारी केलेली नाही.

-----------------

## कर्जत व जामखेड (जि.अहमदनगर) तालुक्यातील कर्जत-कोरेगाव-चापडगाव-चोंडी-हलगाव या रस्त्याच्या कामाकरीता काढलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(१६) * १५७५२ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत व जामखेड तालुक्यातील कर्जत-कोरेगाव-चापडगाव-चोंडी-हलगाव येथील रस्त्याच्या कामाकरीता माहे मार्च, २०२० ते मार्च, २०२२ या दोन वर्षांत काढलेल्या निविदा प्रक्रियेत नियम व अटींचे उल्लंघन, कामाच्या निकृष्टतेबाबत तसेच अपात्र निविदाधारकांना निविदा देणे,याबाबत मुख्य अभियंता यांच्या स्तरावरुन चौकशी करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने निविदा प्रक्रियेत केलेल्या अनियमिततेबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, निवेदन प्राप्त आहे.
(२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नेरे, नवीन पनवेल (जि.रायगड) येथील शेरॉन शाळेतील विद्यार्थ्याला शैक्षणिक शुल्क न भरल्याने परीक्षेला बसू न देणाऱ्या शाळेविरुध्द कारवाई करणेबाबत

**(१७) * १५४३३ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नेरे, नवीन पनवेल (जि.रायगड) येथील शेरॉन शाळेतील इयत्ता तिसरीतील विद्यार्थ्याला शाळेचे शैक्षणिक शुल्क न भरल्याने शाळा व्यवस्थापनाने परीक्षेला बसू दिले नसल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि शाळा शुल्क न भरल्याने इयत्ता तिसरीतील एका विद्यार्थ्याला परीक्षेला बसू न देणाऱ्या सदरहू शाळा व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) होय, संबंधित विद्यार्थ्याला ५ पेपर पैकी १ पेपरला बसू दिले नाही. सदरचा पेपर
दिनांक ०९/११/२०२२ रोजी घेणेत आला.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून परीक्षा उत्तीर्ण होऊन पात्र ठरलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत

**(१८) * १५१३९ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अधिव्याख्याता इंग्रजी, शासकीय तंत्रनिकेतन, शिक्षक सेवा, गट अ या पदासाठी डॉक्टर संध्या सुनिल पोतदार यांच्यासह इतर ८२ उमेदवारांची गुणवत्तेनुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे दिनांक ८ जुलै २०१४ रोजी शिफारस करण्यात आलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परीक्षा झाल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची तपासणी दिनांक १३ ऑगस्ट २०१४ रोजीच्या महाराष्ट्र शासन पत्र क्रमांक ससेनी -३२१४/८६९/प्र.क्र.१६५/ताशी-७ नुसार करण्यात आली होती, मात्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतलेल्या परिक्षेत उत्तीर्ण होऊनही गेल्या आठ वर्षांपासून अद्याप ६१ उमेदवारांची नियुक्ती प्रलंबित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू ६१ उमेदवारांना तात्काळ नियुक्ती देण्याची मागणी शिफारस पात्र उमेदवारांनी राज्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास ई-मेलव्दारे पत्र पाठवून केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने नियुक्तीच्या प्रतिक्षेत असणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती देण्याबाबत शासनाकडून आजमितीस कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) अंशत: खरे आहे.

याबाबत दिनांक १९/१०/२०२२ रोजीच्या ई-मेलव्दारे मा.मंत्री महोदय यांचेकडे निवेदन प्राप्त झाले आहे.

(४) शासकीय तंत्रनिकेतनातील अधिव्याख्याता, इंग्रजी या पदावरील नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दिनांक ०८/०७/२०१४ रोजीच्या पत्रान्वये ८७ उमेदवारांची शिफारस प्राप्त झाली होती. तथापि, शासकीय तंत्रनिकेतनातील कंत्राटी अध्यापकांनी त्यांच्या सेवा नियमित करण्याकरीता दाखल केलेल्या रिट याचिका क्र.२०४६/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी दिनांक १९/१०/२०१३ रोजी उक्त अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत आदेश पारित केले होते. या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे शासनाच्या वतीने दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका क्र.३९०१४/२०१३ मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६/०१/२०१५ रोजी खारीज केल्याने मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक १९/१०/२०१३ रोजीच्या आदेशाचे पालन करण्यासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील विविध विद्याशाखेच्या हंगामी/ कंत्राटी अध्यापकांच्या ५३० पदांवरील सेवा शासनाने नियमित केल्या आहेत. त्यामध्ये इंग्रजी या विद्याशाखेतील ६६ पदांचा समावेश आहे. सदर हंगामी/ कंत्राटी अध्यापकांच्या सेवा नियमित केल्यानंतर रिक्त राहिलेल्या अधिव्याख्याता, इंग्रजी या पदावर महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत २३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली असून उर्वरीत उमेदवारांना नियुक्ती देण्याकरीता पद उपलब्ध नसल्याने त्यांना नियुक्ती देणे शक्य झाले नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारसप्राप्त उमेदवारांच्या नियुक्ती संदर्भात मूळ अर्ज क्र.११८०/२०१६ - श्री.रोमन मोतिराम जनबंधू विरुध्द महाराष्ट्र शासन हे न्यायालयीन प्रकरण सद्य:स्थितीत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांची वीज जोडणी बंद केल्याबाबत

**(१९) * १५८७० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.श्रीकांत भारतीय : तारांकित प्रश्न क्रमांक १३९९० ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व सरकारी मिळुन एकूण १ लाख १० हजार ११४ शाळा असून त्यापैकी १४९५८ शाळांमध्ये वीज पुरवठा नसल्याची बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील १२५२ जिल्हा परिषदेतील शाळांच्या वीज देयकांच्या थकबाकीमुळे महावितरणने वीज जोडणी कापली आहे, तसेच वीज पुरवठा नसलेल्या १४९५८ शाळांपैकी १४२२७ शाळा सरकारी असल्याचे निदर्शनास आले असून वीजेअभावी संगणक बंद पडले असून संगणकाद्वारे शिक्षण घेण्यापासून संबंधित शाळांतील विद्यार्थी वंचित राहत आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापैकी किती शाळांच्या इमारतींना मीटर नसल्याकारणाने/ विद्युत देयक वेळेवर न भरल्याने/ वीजेची पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्याने इ.कारणांमुळे विद्युत पुरवठा केला जात नसल्याने शासनाचे ई-लर्निंग/ डिजिटल शाळा यासारखे पथदर्शी प्रकल्प राबविताना अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित शाळांमधील वीज देयकाची थकबाकी भरुन वीज पुरवठा पुर्ववत करुन संबंधित शाळांना वीजपुरवठा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

(३) होय, अंशत: खरे आहे.

(४) शासन निर्णय, दिनांक ४ जून, २०२० अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांच्या वीज देयक भरणेकरीता ४ टक्के सादील अनुदानातून (रुपये १०००/- प्रति शाळा महिना या मर्यादेत) खर्च भागविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील जिल्हा परिषद शाळांतील कायमस्वरुपी बंद (Permanantly Disconnected) वीज देयकांची थकीत रक्कम अदा करण्याकरीता आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये सादिल अनुदानातून रुपये ५८८.६३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला.

तसेच, आर्थिक वर्ष २०२१-२२ करीता कायमस्वरुपी तसेच तात्पुरत्या वीज पुरवठा खंडीत केलेल्या जिल्हा परिषद शाळांचे वीज देयक अदा करण्याकरीता रुपये १४१८.१६ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता जिल्हा परिषद शाळांचा किरकोळ खर्च भागविण्यासाठी रुपये १०३८.३० लक्ष इतका सादिल निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाळूंज (औरंगाबाद) औद्योगिक वसाहतीमधील नारायणपुर खुर्द येथील नागझरी नदीवरील पूल वाहून गेल्याबाबत

**(२०) * १५३३८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूंज (औरंगाबाद) औद्योगिक वसाहतीमधील नारायणपुर खुर्द येथील नागझरी नदीवरील पूल मागील वर्षी वाहून गेल्यामुळे लासुर स्टेशन पासून जवळपास ३० ते ३५ गावातील कामगारांसह ग्रामस्थांचा दळणवळणाचा मार्ग बंद झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामस्थ व कामगारांना पर्यायी मार्ग म्हणून मुंबई-नागपूर महामार्गाचा वापर करावा लागत असल्याने किमान १० कि.मी.चा फेरा मारुन वाळूंज औद्योगिक वसाहतीत यावे लागते तसेच वाळूंज ते नारायणपुर हा वर्दळीचा रस्ता पूर्ण खड्डेमय झाला असून ग्रामस्थ व वाहन चालकांना ये-जा करणे अत्यंत त्रासाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुर्वी हा रस्ता एमआयडीसीकडे असताना वेळोवेळी दुरुस्ती व्हायची मात्र हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग झाल्याने संबंधित खात्याचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने सदर रस्त्याची दुरुस्ती करणेबाबत दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, तसेच शासनाने सदर रस्ते दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) ऑक्टोबर, २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे माळीवाडा, आसेगांव, आंबेगांव आंबेलोहल प्रजिमा-३२ वरील कि.मी. ८/८०० वरील पुलाचे पोच मार्ग क्षतीग्रस्त झाले होते हे खरे आहे.

सदर ठिकाणी पोच मार्गाची दुरुस्ती करुन रस्ता वाहतूकीकरीता सुरळीत करण्यात आला आहे.

वाळूंज नारायणपूर प्रजिमा-४३ रस्त्यावर ४.३ कि.मी. लांबीत डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे. व १.५ कि.मी. लांबीत कॉक्रीटीकरणाचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लाहेरी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) जवळील गुंडेनुर नदीवरील पूल व चामोर्शी ते हरणघाट नदीपर्यंतचा रस्ता दुरुस्ती करणेबाबत

**(२१) * १५५८५ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाहेरी (ता.भामरागड, जि.गडचिरोली) जवळील गुंडेनुर नदीवर पूल नसल्याने तेथील आदिवासींना श्रमदानातून बनविलेल्या लाकडी पुलावरून जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चामोर्शी ते हरणघाट नदीपर्यंतचा रस्ता पूर्णतः खराब असल्याचेही दिनांक २५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गुंडेनुर नदीवर पूल बांधकामास व चामोर्शी ते हरणघाट नदीपर्यंतचा रस्ता दुरुस्ती करण्याबाबत शासनाने मंजुरी दिली आहे काय, तसेच सदर काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुषंगाने गुंडेनुर नदीवर पूल बांधकामास व चामोर्शी ते हरणघाट नदीपर्यंतचा रस्ता दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

लाहेरीजवळील गुंडेनुर नदीवरील पूल हा राष्ट्रीय महामार्ग क्र.१३० डी वर आहे.

(२) हे खरे आहे.

सदर रस्ता राज्यमार्ग क्र.३७० दर्जाचा आहे.

(३) केंद्र शासनाने JOB NO. NH-१३०-D-MAH-२०२१-२२-०४१ अन्वये गुंडेनुर नदीवर पुल बांधकामास अधीक्षक अभियंता, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, नागपूर यांना परवानगी दिली आहे.

रस्त्याचे डांबरीकरणाचे काम प्रगतीत असून अंतिम टप्प्यात आहे.

(४) गुंडेनुर नाल्यावर पुलाच्या बांधकामाला रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने दिनांक ३१/०३/२०२२ रोजी प्रशासकीय व तांत्रिक मान्यता दिली असून सदर पुलाच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कंत्राटदाराशी करारनामा प्रक्रिया सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत बंद बाटलीसह मोठ्या जारमधील पाण्याची शुध्दता तपासण्याबाबत

**(२२) * १५२०७ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात बंद बाटलीसह मोठ्या जारमधील शुध्द पाण्याचा व्यवसाय मोठ्या प्रमाणात सुरु असून २० लिटर पाण्याचे जार ४० ते ५० रुपयांना विकले जात असून बंद बाटली तसेच मोठ्या जारमधील पाणी शुध्द आहे की नाही हे तपासण्यासाठी प्रशासनाकडे नियमावलीच नसल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाटलीबंद पाण्यातील घटक आरोग्यास अपायकारक नाहीत यासंदर्भात कोणतीही तपासणी केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पारदर्शक बाटलीबंद पाण्याच्या व्यवसायासाठी शासनाची परवानगी घेणे आवश्यक असून, मात्र रंगीत जार मधील पाण्याच्या तपासणीसाठी कोणतीही व्यवस्था नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईसह राज्यात विकल्या जाणाऱ्या बाटलीबंद तसेच मोठ्या जारमधील पाण्याची शुध्दता तपासण्याबाबत नियमावली तयार करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्रशासनाच्या अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्याअंतर्गत नियम व नियमने २०११ नुसार पॅकेजड् ड्रिंकिंग वॉटरसाठी अन्न सुरक्षा व मानके (फूड प्रॉडक्टस ॲण्ड फूड ॲडिटिव्ह) नियमन २०११ मधील नियमन २.१०.८ अन्वये मानके निश्चित करण्यात आलेली आहेत. सदर व्यवसायासाठी अन्न सुरक्षा व मानके कायदयांतर्गत परवाना घेणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगे अन्न व औषध प्रशासनाकडून पॅकेजड् ड्रिंकिंग वॉटरचे अन्न नमुने विश्लेषणासाठी नियमितपणे घेतले जातात.
(३) मोठे जार/रंगीत जार /कॅन मधून थंड पाणी विक्री करणारे युनिटस्/उत्पादक/ विक्रेते यांचे संदर्भात दाखल ओरीजन ॲप्लीकेशन नं.७५/२०१७ विजयसिंह दुबल व इतर विरुध्द MPCB व इतर मध्ये National Green Tribunal (राष्ट्रीय हरीत न्यायाधिकारण), नवी दिल्ली यांनी दिनांक १९/१०/२०२० रोजी दिलेल्या आदेशात “ The point no (c) mentioned in the point no. २३४ on page १५३ मध्ये पाण्याची शुध्दता तपासण्याबाबत नियमावली तयार करणे, मानके निश्चित करणे ही नमूद बाब अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण (FSSAI),नवी दिल्ली यांचे कक्षेत येत असल्याने त्याबाबत अन्न व औषध प्रशासनाकडून सदर प्राधिकरणास अवगत करण्यात आले आहे.
(४) यासंदर्भात चौकशी केली असून मुंबईसह राज्यात विकल्या जाणाऱ्या बाटलीबंद तसेच मोठ्या जारमधील पाण्याची शुध्दता तपासण्यासंदर्भात केंद्रशासनाच्या अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्याअंतर्गत नियमन २०११ मधील तरतुदींनुसार कार्यवाही केली जाते. राज्यशासनास यासंदर्भात कायदा व नियमावली करण्याचे अधिकार नाहीत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदांमधील केंद्रप्रमुखांची रिक्त पदे पदोन्नतीने भरणेबाबत

**(२३) * १६०६७ श्री.सुरेश धस, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षकांना पूर्ण सेवाकालामध्ये कुठलीही पदोन्नती मिळत नसल्याने पूर्वीप्रमाणे केंद्रप्रमुखांची रिक्त पदे पदोन्नतीनेच भरण्यात यावीत ही राज्यातील शिक्षक संघटनांची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाअंतर्गत औरंगाबाद उच्च न्यायालय याचिका क्र. १२१७/२०१९ दिनांक २९ जुलै, २०२२ रोजी दिलेल्या निकालानुसार केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी (शिक्षण) ही दोन्ही पदे समकक्ष आहेत त्यांना पुढील पदोन्नती सेवा वर्ग - २ ची देण्यात यावी असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केंद्रप्रमुखांना रुपये १६५०/- फिरती भत्ता दरमाह देण्यात यावा आणि वसुली थांबविण्यात यावी, केंद्रप्रमुख कर्मचारी सेवेत रूजू होताना शैक्षणिक अर्हता/व्यावसायिक अर्हता पूर्ण करून सेवेत दाखल झाले असल्यामुळे केंद्रप्रमुखांसाठी ५० टक्के गुणांची अट रद्द करण्याची मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांवरील अन्याय दूर करण्यासाठी सन २०१० ते २०२२ या कालावधीतील सर्व शासन निर्णय रद्द करून सन २०१० च्या अगोदर प्रमाणे १००% केंद्रप्रमुखांची रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची संपूर्ण शिक्षकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने केंद्रप्रमुखांची रिक्त पदे १०० % पदोन्नतीने भरण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे आहे.
(५) केंद्रप्रमुखांच्या रिक्त पदांपैकी ५० टक्के पदे पदोन्नतीने व ५० टक्के पदे मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेद्वारे घेण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०२२ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच सदर शासन निर्णयान्वये, केंद्रप्रमुख हे पद जिल्हा परिषदेच्या आस्थापनेमधील असल्याने सेवा प्रवेशासंदर्भात महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम, १९६७ मध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी ग्रामविकास विभागाने कार्यवाही करण्यात यावी असे नमूद केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मातोश्री वसतिगृहात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नसल्याबाबत

**(२४) * १५८६२ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चर्चगेट (मुंबई) रेल्वे स्थानकाजवळ असलेल्या मातोश्री हॉस्टेलमधील खोल्यांवर राजकीय पक्षांचे कार्यकर्ते, शासकीय अधिकारी, शिक्षण पूर्ण झालेल्या काही विद्यार्थ्यांनी कब्जा केल्याने विद्यार्थ्यांना हॉस्टेलमध्ये प्रवेश मिळत नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मातोश्री हॉस्टेलमध्ये आरक्षण मिळत नसल्याने ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी मुंबईत आलेल्या विद्यार्थ्यांना राहण्याची अडचण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामीण भागातून शिक्षण घेण्यासाठी मुंबईत येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मातोश्री हॉस्टेलमध्ये आरक्षण निहाय खोल्यांचे वाटप करण्यासंदर्भात कोणते निकष लावण्यात येत आहेत, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक २३ मे, २०१६ अन्वये शासकीय वसतिगृहामध्ये विद्यार्थी / विद्यार्थीनींना प्रवेशाची नियमावली तयार करण्यात आली असून त्यानुसार प्रवेश देण्यात येतात.
(४) शैक्षणिक सत्र संपुनही वसतिगृहामध्ये वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांकडून दंडात्मक शुल्क आकारुन खोल्या रिक्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२५) * १६१८९ श्री.आमश्या पाडवी, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या पेसा क्षेत्रातील शिक्षकांच्या पदभरतीला शिक्षण विभागाने मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या पेसा क्षेत्रातील शिक्षक भरतीस वित्त विभागाकडून मंजूरी देण्यात यावी तसेच शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमत्ता चाचणी परीक्षा (टी.ए.आय.टी.) २०२२ ची निविदा प्रक्रिया राबणे, अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या (पेसा) जागांवर बाहेरील जिल्ह्यातील बदली प्रक्रियेत पात्र ठरलेल्या ४७८ शिक्षकांना तात्काळ बदली देऊन ती पदे तात्काळ रिक्त करणे इत्यादी विविध मागण्यांसंदर्भात आदिवासी डी.टी.एड्. बी.एड. कृषी समिती, पालघर, महाराष्ट्र राज्य (नियो) या संघटनेने मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांकडे दिनांक १२/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या पेसा क्षेत्रामधील शिक्षकांची बरीच पदे रिक्त असल्याने आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होत आहे तसेच शिक्षकांची १०० पदे भरण्याबाबत वित्त विभागाने काढलेल्या परिपत्रकांमुळे भरती प्रक्रिया रखडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागण्यांसदर्भात दिनांक १९ सप्टेंबर,२०२२ रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे ठिय्या आंदोलन करण्यात आले असून बिंदुनामावलीनुसार अनुसूचित जमातीच्या पेसा क्षेत्रातील संपूर्ण रिक्त पदे भरण्यासाठी शासन स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी शिक्षण सहसंचालक, प्रशासन, अंदाज व नियोजन, शिक्षण आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी मा.सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक २० सप्टेंबर, २०२२ रोजी लेखी निवेदनाव्दारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त संघटनेच्या मागण्यांबाबत आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे त्याचप्रमाणे वित्त विभागाने काढलेल्या त्रुटी पूर्ततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
(२) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येते.
(३) अंशत: खरे आहे.
(४) याबाबतचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येते. पेसा क्षेत्रातील १०० टक्के पदे भरण्यास मान्यता घेण्यासाठी वित्त विभागास प्रस्ताव सादर केला आहे.
(५) पेसा क्षेत्रातील पद भरतीबाबत वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर केलेल्या प्रस्तावावर वित्त विभागाने काही मुद्दे उपस्थित केले होते. सदर मुद्यांच्या माहितीसह पदभरतीस मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव पुन:श्च वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षक पात्रता परिक्षेमधील (टीईटी) गैरप्रकारामध्ये दोषी आढळलेल्या शिक्षक उमेदवार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२६) * १६१०९ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक १२०४३ ला दिनांक ८ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या "टीईटी" परीक्षेत झालेल्या गैरव्यवहारातील उमेदवारांची (शिक्षकांची) चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश शिक्षण संचालकांनी सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकास दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी देऊन तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तातडीने शासनास सादर करण्याच्या सूचना करुनही विभागीय स्तरावरील कारवाईचा अहवाल माहे सप्टेंबर, २०२२ अखेरपर्यंत शासनास सादर करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक पात्रता परिक्षेमधील (टीईटी) १ हजार ६६३ आणि सन २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या सदर परिक्षेतील ७ हजार ८८० उमेदवारांची प्रमाणपत्रे (संपादणूक) रद्द करण्याची कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, "टीईटी" गैरप्रकारात दोषी आढळून आलेले अनेक शिक्षक आजही शाळेत कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने या सर्व प्रकरणातील दोषी असलेल्या शिक्षकांवर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सुनावणी घेतल्या आहेत. तथापि, मा.न्यायालयाचे आदेश असल्याने त्यावर निर्णय घेऊन अहवाल सादर करण्यात आलेला नाही.

(२) व (३) हे खरे आहे.

मा.उच्च न्यायालय यांनी पुढील आदेशापर्यंत सेवेतून बडतर्फ न करणेबाबत आदेश दिले असल्याने सदर शिक्षक सेवेत आहेत.

(४) याबाबत दाखल रिट याचिकांमध्ये मा.न्यायालयाने पुढील आदेश होईपर्यंत संबंधितांवर कारवाई करु नये, असे अंतरिम आदेश दिले आहेत. तथापि, सर्व न्यायालयीन प्रकरणांची एकत्रित सुनावणी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे घेण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सदर शिक्षकांवर कारवाई करता आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: निजामपूर ते माणगाव व विळेभागाड एम.आय.डी.सी. हद्दीत (जि.रायगड) विविध प्रकल्पांची कामे सुरु करण्याबाबत

**(२७) * १५१७८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्वात मोठा प्रकल्प म्हणून दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॉरीडोर (डीएमआयसी) हे आता नॅशनल इंडस्ट्रीअल कॉरीडोर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एनआयसीएल) झाले असून सुमारे १५ वर्षांपूर्वी घोषणा होऊन रायगड जिल्ह्यातील निजामपूर ते माणगाव विळेभागाड एमआयडीसी हद्दीत विविध प्रकल्पांसाठी ५ हजार ४० हेक्टर क्षेत्रात २००८ पासून भूसंपादन करण्यात आलेले असूनही आतापर्यंत एकही उद्योग सुरू झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाच्या कामाचा उरक पाहता, पुढील सात ते आठ वर्षे तरी येथे कोणताही प्रकल्प सुरू होण्याची कोणतीच लक्षणे दिसत नसल्यामुळे रोजगाराअभावी येथे शेतकऱ्यांच्या मुलांना तसेच तरूण पिढीला बेरोजगार होण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे थोडक्यात स्वरूप काय आहे, या प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरू होण्यास किती कालावधी लागण्याची शक्यता आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदरहू प्रकल्पाचे काम शीघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॉरीडोर (डीएमआयसी) प्रकल्पातंर्गत दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्र या नोडचाही समावेश असून, सदर नोडचा विकास महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लि. (MITL) मार्फत करण्याचे प्रस्तावित आहे. दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्रातंर्गत मऔवि महामंडळाने ५० गावांमधील एकूण १२१४०.८७२ हे.आर क्षेत्र अधिसूचित केलेले आहे. त्यापैकी टप्पा क्र. १ मधील संपादित ६३२७.००

हे.आर क्षेत्र विभागून Parcel A (३९२५.०० हे.आर) चा विकास मऔवि महामंडळामार्फत व Parcel B (२४०२.०० हे.आर) चा विकास महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लि. मार्फत करण्यासंबंधीचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाच्या नॅशनल इंडस्ट्रीअल कॉरीडोर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NICDCL) यांच्याकडे पाठविला आहे. केंद्र शासनाने सदर प्रस्तावाची मंजूरी अंतिम टप्प्यात आहे. महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लि. मार्फत विकासासाठी प्रस्तावित क्षेत्रामध्ये २४०२.०० हे.आर खाजगी क्षेत्र व ४८.८२ हे.आर सरकारी क्षेत्राचा समावेश आहे. त्यापैकी २००९.९५५७ हे.आर क्षेत्र संपादित करण्यात आले असून ३९२.०४७३ हे.आर क्षेत्र सक्तीने संपादन करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकल्पासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे नियोजन व उत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधांचे अंमलबजावणी करणेकरीता M/s EGIS India Consulting Engineers Pvt. Ltd. या संस्थेला निविदेव्दारे केंद्र शासनाकडून नियुक्त केले आहे. सदर संस्थेने संपूर्ण दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्राकरीता (मऔवि महामंडळाचे ३९२५.०० हे.आर व AITLचे २४०२.०० हे.आर) Master Plan आणि DPR तयार केलेला आहे. सदर Master Plan आणि DPR ला मऔवि महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २०/०९/२०२२ रोजी मंजूरी मिळाली आहे. सदरील मंजूर Master Plan आणि DPR मधील पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणी करीता PMNC (Program Management for New Cities) नियुक्त करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून नजिकच्या काळात लवकरच हा प्रकल्प कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तसेच केंद्र शासनाकडील भागीदार रक्कम प्राप्त झालेनंतर विकासाची कामे त्वरीत हाती घेण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शालेय गृहपाठ बंद करण्याच्या निर्णयाबाबत

**(२८) * १५३६३ श्री.अरुण लाड, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आगामी शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यावर अभ्यासाचे ओझे न लादता त्यांच्या मेंदूचा विकास होण्याकरीता तसेच गृहपाठ ही शिक्षकांसाठी पळवाट असता कामा नये, त्याचबरोबर अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पटकन आणि योग्य समजेल अशा पध्दतीने शिक्षकांनी शिकविण्याची आवश्यकता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना गृहपाठाची गरज भासणार नाही हे लक्षात घेता इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचा शालेय गृहपाठ बंद करण्याबाबत शासन विचार करीत असल्याचे मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी पुणे येथील महा.राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात घोषणा केल्याचे दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा होत नाहीत त्यामुळे त्यांची शैक्षणिक गुणवत्ता कळत नाही त्यासाठी इयत्ता तिसरी ते आठवीच्या परीक्षा जुन्या पध्दतीने सुरु करण्याचा व शाळांच्या वेळात बदल करण्याचा शासनाचा विचार असल्याचेही मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी त्याच कार्यक्रमात वक्तव्य केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत राज्यातील शिक्षक संघटना, संस्थाचालक व शिक्षण तज्ज्ञांशी चर्चा करुन अंतिम निर्णय घेतला जाईल असेही मा.मंत्री महोदयांनी त्याचवेळी सुचित केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने अंतिम निर्णय घेतला आहे काय, असल्यास केव्हा व त्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, निर्णय घेतला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या शिफारशी व PARAKH या संस्थेच्या मार्गदर्शक सूचना, नव्याने तयार होणारा अभ्यासक्रम यावर आधारित समिती स्थापन करून तसेच शिक्षक संघटना,संस्थाचालक व शिक्षण तज्ञ यांच्याशी चर्चा करून, बैठका घेऊन अंतिम उचित निर्णय विद्यार्थी हित व शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने घेण्यात येईल.

-----------------

## राज्यातील शिक्षकांच्या गुणवत्तेचा दर्जा कमी होत असल्याबाबत

**(२९) * १५०८९ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण पदासाठी बंधनकारक असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेत राज्यातील उत्तीर्ण शिक्षकांची टक्केवारी अवघी ४ टक्के असल्याचे दिनांक २४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पात्रता परीक्षेत मुंबई विभागातील १ हजार ५२१ शिक्षक उत्तीर्ण झाले असून हा निकाल केवळ १ टक्के आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शिक्षकांच्या घसरत चाललेल्या गुणवत्तेबाबत शासनाने परीक्षण केले आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शिक्षकांच्या गुणवत्तेचा दर्जा वाढविण्यासाठी शासनाकडून कोणत्या उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) दिनांक २१/११/२०२१ रोजी आयोजित शिक्षक पात्रता परिक्षेचा अंतरिम निकाल दिनांक २१/१०/२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आला. त्यामध्ये पात्रतेची टक्केवारी ३.६९ टक्के इतकी आहे.

(२) सदर परीक्षेसाठी मुंबई विभागात एकूण १५३० उमेदवार पात्र ठरलेले आहेत. सदर परीक्षेमधील मुंबई विभागाची पात्रतेची टक्केवारी २.६९ टक्के इतकी आहे.

(३) "स्टार्स" प्रकल्पअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांचे आशयाधारित मूल्यांकन करणे नियोजित आहे.

यासाठी प्रायोगिक तत्वावर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत जिल्हा परिषदेच्या शाळोतील इयत्ता १ ली ते ८ वीच्या वर्गांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचे आशयाधारित मूल्यांकन ऑनलाईन स्वरुपात करण्यात आले आहे.

(४) शिक्षकांच्या गुणवत्तेचा दर्जा वाढविण्यासाठी "स्टार्स" प्रकल्प अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांसाठी गरजाधिष्ठित ऑनलाईन व ब्लेंडेड मोड कोर्सची निर्मिती करण्यात येत आहे.

तसेच निष्ठा १.०, निष्ठा २.० चे आयोजन करुन शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांमधील इयत्ता १ ली ते ५ वीच्या शिक्षक व मुख्याध्यापक यांचेसाठी ऑनलाईन निष्ठा ३.० (FLN) चे आयोजन करण्यात आले होते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील अलिबाग समुद्र किनाऱ्यावरील संरक्षण भिंतीचे नुकसान झाल्याबाबत

**(३०) * १५४०४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात माहे जून, २०२२ ते माहे जुलै, २०२२ मध्ये तब्बल ४६ वेळा समुद्राच्या मोठ्या उधाणाचा किनाऱ्यापट्टीस भिंतीस तडाखा बसला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्राच्या उधाणाच्या मोठ्या लाटांच्या माऱ्यामुळे अलिबाग समुद्र किनाऱ्यालगतच्या संरक्षण भिंतीची मोठी पडझड झाली असून, काही ठिकाणी संरक्षण भिंतीला भगदाड पडले आहे तसेच वरसोली येथील ग्रोयन्स बंधाऱ्याचीही मोठ्या प्रमाणात नासधूस झाली असून, मुरूड किनाऱ्यावर टाकलेला वाळूचा भरावही वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समुद्राच्या मोठ्या उधाणामुळे रायगड जिल्ह्यातील बहुतांश समुद्रकिनारे उध्वस्त झालेले असून लहान मच्छीमारी जेट्टीही लाटांच्या माऱ्यामुळे जीर्ण झाल्या आहेत, तसेच खाडीलगतच्या अनेक गावांना समुद्राच्या उधाणाचा फटका बसला असून अनेक घरांचे नुकसान झालेले असून कमकुवत खार बांधबंदिस्ती बंधारे वाहून गेल्याने खारे पाणी शेतात शिरल्याने मोठ्या प्रमाणात भातशेती धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रायगड जिल्ह्यात एकूण १६५ खारभूमी योजना असून या योजनांची सद्यःस्थिती काय आहे याची माहिती खारभूमी विभागाकडून मागविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अलिबागसह रायगड जिल्ह्यातील समुद्र किनाऱ्यालगतच्या संरक्षक भिंतीच्या दुरूस्तीसाठी, लहान मच्छीमारी जेट्टीच्या दुरूस्तीसाठी तसेच अतिवृष्टीमुळे समुद्राच्या उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे नादुरूस्त बांधबंदिस्ती बंधारे दुरूस्तीसाठी तसेच नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) होय. अंशत: खरे आहे. रायगड जिल्ह्यात १६५ योजना असून त्यापेकी बहुतांश खारभूमी योजनांचे नुतनीकरण होऊन १५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. त्यामुळे योजना जीर्ण झाल्या असून उधाणांमुळे खांडी पडतात. तसेच रायगड जिल्ह्यातील अतिवृष्टी व येणारी मोठी उधाणे यामुळे योजना कमकुवत झाल्याने खांडी पडण्याचे प्रमाण वाढत असल्याने खारे पाणी शेतात घुसून भातशेती धोक्यात येण्याची शक्यता निर्माण होते असे जलसंपदा विभागाने त्यांचे १२/१२/२०२२ चे पत्रान्वये कळविले आहे.

(४) रायगड जिल्ह्यात एकूण १६५ खारभूमी योजना असून १३२ योजना पूर्ण झालेल्या आहेत.

(५) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत अलिबाग कोळीवाडा ते डि.एस.पी.बंगला येथील समुद्र धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे मजबूतीकरण करण्याचे काम सन २०२१-२०२२ च्या अर्थसंकल्पात मंजूर असून सदर कामास पार्यावरण विभागाकडून SEIAA परवानगी अप्राप्त आहे. तसेच किनारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई यांचेमार्फत अलिबाग तालुक्यातील अलिबाग, वरसोली, चाळमहा, थळ, नवेदर नवगांव, किहीम, आवास, सासवणे, कोळगांव, मांडवा, मिळकतखार, सारळपुल, बागदांडा, रांजणखार, डावली, आक्षी, नागांव व रेवदंडा येथील समुद्र धूपप्रतिबंधक बंधाऱ्याची कामे कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

खारभूमी विभागाला प्राप्त होणाऱ्या निधीनुसार बंदिस्तीतील पडणाऱ्या खांडीच्या दुरुस्तीच्या कामाचे नियोजन करुन त्यास सक्षम स्तरावर मान्यता घेऊन प्रचलित शासकीय कार्यपध्दतीनुसार खांडी बुजवून खारे पाणी शेतात घुसणार नाही याची दक्षता घेतली जाते. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात रायगड जिल्ह्यातील ४० योजनांच्या नुतनीकरणांचे नियोजन केले अरहे. त्यापैकी ४ योजनांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. १० योजनांची अंदाजपत्रके सादर झाली असून उर्वरित योजनांची अंदाजपत्रके बनविण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातून जाणाऱ्या माजिवाडा ते वडपे या राष्ट्रीय महामार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३१) * १५६०६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे तसेच जवळील शहरांसह नाशिक जिल्ह्यातील वाहतूकीसाठी महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या मुंबई-नाशिक महामार्गावरील माजिवाडा ते वडपे या मार्गाचे गत तीन वर्षांपासून अपुर्णावस्थेत असल्याचे माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याचे काम अपुर्णावस्थेत असल्याने ठाणे शहरासह मुंबईतील नागरीकांना देखील वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने उक्त कामाकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच माजिवाडा ते वडपे या रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) होय.
(३) व (४) माजिवडा ते वडपे या भागाचे (कि.मी.५३९.२०२ ते कि.मी.५६३) ६ पदरीकरणासाठी सन २०१७ मध्ये सदर रस्ता केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे कडे हस्तांतरीत करण्यात आला. सन २०१७ मध्ये वरील कामासाठी BOT अंतर्गत निविदा मागविल्या परंतु कोणत्याही पात्र निविदाकारांनी निविदा सादर केली नसल्याने DPR मध्ये सुधारणा करुन HAM तत्वावर काम हाती घेण्याचे प्रस्तावित करण्यात आले. त्यानुसार सन २०१७ मध्ये निविदा प्रक्रिया सुरु करुन दिनांक २८/०३/२०१८ रोजी मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स व लॉंगनिअन रोड ॲण्ड ब्रीज कं.लिमिटेड या उद्योजकाला LOA जारी करण्यात आला व प्रकल्पासाठी नियुक्त केलेली तारीख २१/०१/२०१९ होती. परंतु उद्योजकाच्या Non-Performance मुळे उद्योजकाला substitute करुन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ इन्फ्रा प्रोजेक्टस लि. यांना भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या वतीने वडपे ते ठाणे या राष्ट्रीय महामार्गाच्या दर्जोन्नतीसाठी दिनांक १६ जून, २०२१ पासून उद्योजक म्हणुन नियुक्त केले आहे. महामंडळामार्फत सदर महामार्गाच्या चौपदरी रस्त्याचे आठ पदरी कॉंक्रिटीकरणाने रुंदीकरणाचे काम करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ इन्फ्रा. प्रोजेक्टस लि.यांनी पावसाळयानंतर ऑक्टोबर २०२१ मध्ये कामे सुरु केल्यानंतर वनखात्याने काम थांबविले. यामुळे कामाला विलंब झाला. वन जमिनीच्या वळतीकरणाचा प्रस्ताव तातडीने जमा करुन ०५/०८/२०२२ रोजी वनविभागाची मंजूर मिळविण्यात आली. सद्य:स्थितीत काम वेगाने सुरु आहे.

-----------------

## जळगाव ते अजिंठा व औरंगाबाद ते अजिंठा रस्त्यांचे काम अपुर्णावस्थेत असल्याबाबत

**(३२) * १५२६४ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव ते अजिंठा व औरंगाबाद ते अजिंठा या महाराष्ट्र राज्य रस्ते विकास प्राधिकरणाकडून करण्यात येत असलेल्या रस्त्याचे बांधकाम गेल्या २ वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे अर्धवट झालेले बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्याच्या बांधकामाची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे कामास कार्यारंभ आदेश कधी देण्यात आला व किती कालावधीत हा रस्ता पूर्ण करण्यात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे तदनुसार रस्त्याच्या बांधकामाची गुणवत्ता, नियंत्रण विभागकडून चौकशी व तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे. सदरचे काम राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.)विभागामार्फत सुरु आहे
(२) हे खरे नाही. सदर रस्त्याच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी करीता अधिकारी अभियंता (Authority's Engineer) ची नेमणूक करण्यात आली आहे. औरंगाबाद ते सिल्लोड भाग-१ करीता दिनांक ०६/०९/२०२२ व सिल्लोड ते अजिंठा (फर्दापूर) भाग-२ करीता दिनांक २८/०९/२०२२ रोजी कामाची दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत तपासणी करण्यात आली आहे.
(३) सदर रस्त्याचे काम औरंगाबाद ते सिल्लोड भाग-१, सिल्लोड ते फर्दापूर भाग-२ व फर्दापूर ते जळगाव भाग-३ असे तीन भागात करण्यात येत आहे. या कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १५/०६/२०१७, १२/०६/२०१७ व १२/०६/२०२७ अनुक्रमे रोजी देण्यात आले आहेत. भाग-२ व भाग-३ ची कामे मार्च,२०२३ अखेर व भाग-१ चे काम हर्सुलचा भुसंपादनाचा भाग सोडून मार्च,२०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) भाग-१ करीता दिनांक ०६/०९/२०२२ व भाग-२ करीता दिनांक २८/०९/२०२२ रोजी दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत तपासणी करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्धवेळ शिक्षकांना अतिरिक्त घोषित करून पुन्हा सेवेत समाविष्ट करून घेणेबाबत

**(३३) * १५८३२ श्री.किशोर दराडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.बाळाराम पाटील, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली १९८१ नियम २१ अंतर्गत कार्यभारानुसार शिक्षक संख्या मंजूर करताना प्रमाणित कार्यभाराच्या १/३ पेक्षा कमी कार्यभाराकरीता पूर्ण वेळ शिक्षकाचे पद मंजूर न करता अर्धवेळ शिक्षकाचे पद मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अर्धवेळ कर्मचारी हे महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली १९८१ नियम २१ अंतर्गत सर्व अटी व शर्तींची पूर्तता करतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आर.टी.ई. कायदा २००९ व शासन निर्णय दिनांक २८ ऑगस्ट २०१५ नुसार अर्धवेळ हे पद सेवक संचात व्यपगत करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर अर्धवेळ शिक्षकांना महाराष्ट्र खाजगी कर्मचारी सेवाशर्ती नियमावली १९८१ नियम २६ प्रमाणे अतिरिक्त ठरवून दुसऱ्या ठिकाणी अतिरिक्त करून त्यांच्या सेवेला संरक्षण देण्याची मागणी लोकप्रतिनिधीकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) होय.
(३) प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांकरीता शासन निर्णय २८/०८/२०१५ नुसार संचमान्यतेचे निकष निश्चित करण्यात आलेले असून निकषामध्ये अर्धवेळ शिक्षकाचे पद ठेवण्यात आलेले नाही.
(४), (५) व (६) सद्य:स्थितीत माध्यमिक शाळांमध्ये अर्धवेळ शिक्षक कार्यरत असून यांना संचमान्यतेत ऑफलाईन दुरुस्ती करुन वेतन अदा करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

-----------------

## वरळी (मुंबई) येथील पोलीस वसाहतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(३४) * १५३०९ श्री.सचिन अहिर, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरळी, मुंबई येथील सरपोचखानवाला रोड येथील पोलीस वसाहतीतील अनेक इमारतीच्या लोखंडी सळया बाहेर येऊन पिलरला, स्लॅबला तडे जाऊन त्यातून पाण्याची गळती होत असल्याचे दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इलेक्ट्रोनिक वायरिंग खुल्या झाल्यामुळे शॉटसर्किट होऊन मनुष्यहानीची भिती रहिवाशांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत रहिवाशांनी, पोलीस कर्मचारी, सामाजिक संघटनेने त्याचप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभाग, वरळी यांच्याकडे वारंवार तक्रार करुनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद् नुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही कार्यवाही न करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली व सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई येथील पोलीस वसाहतीमध्ये एकूण ८७ इमारती असून सदर इमारतींचे सरासरी आर्युमान सर्वसाधारणपणे २७ ते ४५ वर्षे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) हे खरे नाही.
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई येथील पोलीस वसाहतीमधील जुन्या पोलीस वसाहतीमध्ये ६३ इमारती असून नवीन पोलीस वसाहतीमध्ये २४ इमारती आहेत. नवीन पोलीस वसाहतीमधील २४ इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करण्यात येवून संरचनात्मक परिक्षण अहवालानुसार १८ इमारती कमकुवत असल्याने रिक्त करण्यात आल्या आहेत व उर्वरित ६ इमारतींचे मजबुतीकरणाचे कामे पूर्ण करण्यात आले आहेत.

जुन्या पोलीस वसाहतीतील ६३ इमारतीचे संरचनात्मक परिक्षण सन २०१८-१९ मध्ये करण्यात आले असून त्यास अनुसरुन निधीच्या उपलब्धतेनुसार काही इमारतींची कामे पूर्ण करण्यात आली असून उर्वरित इमारत दुरुस्तीची कामे प्रगतीत आहेत. निवासस्थानामधील स्थापत्य व विद्युतीकरणाच्या दुरुस्तीची कामे सद्य:स्थितीत अंदाजे ८०% कामे पूर्ण झाले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत वरळी पोलीस वसाहती संदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने वेळोवेळी दखल घेऊन दुरुस्तीबाबत उपलब्ध निधीस अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कार्यवाही करण्यात येते.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खोसपुरी (ता.नगर) येथे मिरी ते पांढरीपुल रोडवरील शिवारात रेशनिंगचा तांदूळ काळया बाजारात विक्रीकरीता नेणारा ट्रक पकडण्यात आल्याबाबत

**(३५) * १६३९० श्री.महादेव जानकर :** सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोसपुरी (ता.नगर) मिरी ते पांढरीपुल रस्त्यावरील शिवारात रेशनिंगचा ३३ टन तांदूळ काळया बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने घेऊन जाणारा ट्रक अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या पथकाने पकडला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय.
(२) जिल्हा पुरवठा कार्यालय, अहमदनगर यांच्या पथकाकडून दिनांक १३/११/२०२२ रोजी झालेल्या कार्यवाहीनुसार या प्रकरणी वाहन क्र. एम.एच.२३, एयु ७९२१ या वाहनाचे वाहन चालक श्री.गोकुळ महादेव जाधव, रा.आर्वी, ता.शिरूर कासार यांनी दिलेल्या जबाबानुसार वाहन क्र. एम.एच.२३, एयु ७९२१ या वाहनाचे मालक श्री.अशोक उध्दव पवार, रा.अमळनेर भांड्याचे, ता.शिरूर कासार, जि.बीड, श्री.सुनील कंठाळे, रा.दहिवंडी, ता.शिरूर कासार, जि.बीड, ट्रक चालक श्री.गोकुळ महादेव जाधव, रा.आर्वी, ता.शिरूर कासार, जि.बीड यांच्याविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, अहमदनगर येथे जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा रजिस्टर नं. ०८७२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच, वाहन चालकाच्या जबाबानुसार दिनांक १३/१२/२०२२ रोजी तहसिलदार, पाटोदा यांनी मौजे अंमळनेर, ता.पाटोदा, जि.बीड येथील खाजगी गोदामाची पंचांसमक्ष तपासणी केली असून सदर तपासणीअंती सदरहू खाजगी गोदाम पंचांसमक्ष सील केले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकृषी विद्यापीठ व अनुदानित महाविद्यालयांतील सहा.प्राध्यापक व शिक्षकेतरच्या रिक्त जागा भरणेबाबत

**(३६) * १५६९४ श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.बाळाराम पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक पदभरतीसाठी संवर्ग निहाय आरक्षण लागू केले असून, सहा.प्राध्यापक व शिक्षकेतर रिक्त पदांची भरती सुरु करणेकरीता तत्कालीन मा.वित्त मंत्री महोदय यांनी दिनांक ०२ सप्टेंबर, २०२१ रोजी बैठक घेवून कार्यवाही करण्याचे निर्देश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित राज्यात अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील सहा.प्राध्यापकांची मार्च, २०२२ अखेर १०८४९ पदे रिक्त असून फक्त २०८८ पदे भरण्यास मान्यता दिलेली आहे, एवढ्या मोठ्या प्रमाणावर शिक्षकीय पदे रिक्त असल्याने शैक्षणिक अडचणी तसेच नॅकसाठीही अडचणी येत आहेत, तसेच कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथील सहाय्यक प्राध्यापकांची पदे अनेक वर्षापासून अद्यापही रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अकृषी विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर ११३७० पदे रिक्त असून पदभरतीसाठी अद्याप कार्यवाही नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येवर आधारित मार्च २०२२ रोजी रिक्त असलेली सहा.प्राध्यापकांची १०८४९ पदे व शिक्षकेतर ११३७० पदे तसेच नवीन शैक्षणिक वर्षामध्ये कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक येथील सहाय्यक प्राध्यापकांच्या पदाचा अनुशेष भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) हे ही अंशतः खरे आहे.

दिनांक ०१/१०/२०१७ च्या विद्यार्थी संख्येच्या आधारे एकूण ८९४९ पदे रिक्त होती. त्यापैकी ४० टक्केच्या मर्यादेत व इतर एकाकी पदांचे/महत्वाच्या पदांच्या १०० टक्के पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली होती. सदरहू पदांपैकी सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील ३५८० पदे राज्यातील महाविद्यालयांमध्ये ८० टक्केच्या मर्यादेत समान वाटप करण्यात आलेली आहेत.

सद्यःस्थितीत राज्यातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकीय पदभरती करताना विषयनिहाय आरक्षण धोरणाचा अवलंब करण्यात येत होता. मात्र केंद्राने संवर्गनिहाय आरक्षण अध्यापक संवर्गातील आरक्षण अधिनियम २०२१ नुसार राज्यातील अकृषी विद्यापिठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था मधील शिक्षकीय पदांचे संवर्गनिहाय आरक्षण धोरण सामान्य प्रशासन दिनांक ०१/०४/२०२२ रोजीच्या अधिसुचनेन्वये लागू करण्यात आलेले आहे. त्यानुसार अंमलबजावणी करण्याबाबत विभागाने दिनांक ०८/०४/२०२२ रोजी आधिसुचना निर्गमित केली आहे.

तसेच सर्व महाविद्यालयांनी बिंदू नामावली निश्चित करुन घेऊन नवीन आरक्षण धोरणानुसार पदभरती ना-हरकत प्रमाण पत्रासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत. दिनांक ०८/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश देण्यात आलेली आहेत. त्यानुसार परभरतीची कार्यवाही सुरू आहे.

कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक या विद्यापीठासाठी एकूण ३५ शिक्षकीय पदे मंजूर असून, त्यामध्ये २० सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील आहेत. सदर २० सहाय्यक प्राध्यापकांच्या पदांपैकी १२ पदे कार्यरत असून ०८ पदे रिक्त आहेत. शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ अन्वये अकृषी विद्यापीठे व अभिमत विद्यापीठांमधील एकूण ६५९ रिक्त शिक्षकीय पदे भरण्यास मंजूरी देण्यात आली होते. तथापि, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर वित्त विभागाने पदभरतीवर निर्बंध घातल्याने सदर भरतीप्रक्रिया राबविता आली नाही. त्यामुळे सदर ६५९ रिक्त पदे भरण्यास पुनःश्च वित्त विभागाची मंजूरी घेऊन सदर पदांची भरतीप्रक्रिया पूर्ण करण्यास शासन निर्णय दिनांक १६/११/२०२२ अन्वये मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठास एकूण १२ शिक्षकीय पदे भरण्यास मंजूरी देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्रभारी मुख्याध्यापकांना नियमित वेतनाव्यतिरिक्त मानधन तसेच अर्जित रजेचे रोखीकरण मंजूर करणेबाबत

**(३७) * १५७३६ श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रभारी मुख्याध्यापकांना मिळणाऱ्या नियमित वेतनाव्यतिरिक्त मानधन लागू करणे व या काळात जमा होणाऱ्या अर्जित रजेचे रोखीकरण करणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार प्रभारी मुख्याध्यापकांना मिळणाऱ्या नियमित वेतनाव्यतिरिक्त मानधन लागू करणे व या काळात जमा होणाऱ्या अर्जित रजेचे रोखीकरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या व होणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्याबाबत

**(३८) * १५५२० श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवानिवृत्तीच्या वर्षामध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्त सेवा झाल्यास सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यास दिनांक १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्याबाबत नागपूर विभागाच्या शिक्षक जनप्रतिनिधींनी दिनांक ०३/०६/२०२२ व १७/०६/२०२२ रोजी वा त्या सुमारास तत्कालीन मा.मंत्री महोदयांना निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली १९८१ मधील नियम क्र. १० मध्ये सुधारणा करून महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली २००९ लागू करण्यात आली असून त्यानुसार राज्यातील शिक्षक/कर्मचाऱ्यांना दरवर्षी दिनांक १ जुलै रोजीची वेतनवाढ देण्याचे धोरण निश्चित करण्यात आले व त्याची अंमलबजावणी सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक/कर्मचाऱ्यांना सर्व अटींची पूर्तता करीत असतानासुद्धा दिनांक १ जुलै रोजी सेवेत नसल्याच्या कारणास्तव वेतनवाढीच्या लाभापासून वंचित ठेवण्यात येते ही बाब अन्यायकारक व नियमातील तरतुदींचे उल्लंघन करणारी आहे, तसेच मा.मद्रास उच्च न्यायालयाने याचिका क्र. १५७३२/२०१७ मध्ये दिनांक १५/०९/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयानुसार याचिकाकर्त्यांस १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ मंजूर केली, तसेच मा.मद्रास उच्च न्यायालयाचा सदर निर्णय भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वैध घोषित केला त्याचप्रमाणे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्र. ५८६४/२०१९ व याचिका क्र. ३४५७/२०२१ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार याचिकाकर्त्यांना १ जुलैच्या वेतनवाढीचा लाभ देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न केल्यामुळे न्यायालयात याचिका करणाऱ्या सेवानिवृत्त शिक्षक/कर्मचाऱ्यांना दिनांक १ जुलै रोजीच्या काल्पनिक वेतनवाढीचा लाभ देय ठरला परंतु मा.न्यायालयात याचिका दाखल न करणारे शिक्षक/कर्मचारी यांना दिनांक १ जुलैच्या काल्पनिक वेतनवाढ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुषंगाने सेवानिवृत्तीच्या वर्षात (दिनांक ०१ जुलै ते ३० जून) सहा महिन्यापेक्षा जास्त सेवा झाल्यास सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यास एक वेतनवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) सदर प्रकरणी सद्य:स्थितीत अद्याप शासनाचे कोणतेही धोरण ठरलेले नाही. शासनाने कोणतेही नियम निर्गमित केलेले नाहीत. तसेच नमूद करण्यात येते की, केंद्र शासनाच्या दिनांक ०३/०२/२०२१ रोजीच्या ज्ञापनान्वये श्री.अय्यमपेरूमल यांच्या व्यक्तिगत प्रकरणी झालेला निर्णय हा in rem (सर्वांना लागू करण्याबाबत) बाबतचा प्रश्न अजून Open असल्याचे नमूद केले आहे. तसेच केंद्र शासनाच्या दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या ज्ञापनान्वये अन्य प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या आदेशास स्थगिती दिल्याचे नमूद केलेले आहे. ही बाब केंद्र शासनाने दिनांक ०१/०७/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना दिनांक २४/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेंतर्गत वाहन वाटपात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३९) * १६५२९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील ८०० बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेंतर्गत वाहनांचे वाटप करण्याकरीता प्रत्येक लाभार्थ्यांकडून रुपये ३३ हजार घेऊनही गत सहा महिन्यांपासून लाभार्थी उक्त लाभापासून वंचित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त लाभार्थ्यांना वाहन वाटप कार्यक्रमांतर्गत वाहनांच्या चाव्यांचे वितरण करण्यात आले परंतु कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर वाहनांच्या चाव्या लाभार्थ्यांकडून परत घेण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने बेरोजगार लाभार्थ्यांना वाहन वाटप न करता आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

जिल्हा उद्योग केंद्र, पालघर यांना सन २०२२-२३ करीता मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेंतर्गत एकूण ८०० कर्ज प्रकरणांचे लक्षांक देण्यात आले आहे. सदर योजनेंतर्गत वाहनांचे वाटप करण्याकरीता प्रत्येक लाभार्थ्यांकडून रुपये ३३ हजार घेतल्याचे व मागील सहा महिन्यांपासून लाभार्थी लाभापासून वंचित असल्याची कोणतीही तक्रार विभागास प्राप्त झालेली नाही.
(२) सदर योजनेंतर्गत उद्योग संचालनालयामार्फत कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला नाही. त्यामुळे वाहनांच्या चाव्यांचे वाटप व कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर चाव्या परत घेण्याबाबत प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय विज्ञान संस्थेत कर्मचाऱ्यांअभावी प्रयोगशाळा व ग्रंथालय बंद असल्याबाबत

**(४०) * १५४८९ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील शासकीय विज्ञान संस्थेत कर्मचाऱ्यांची कमतरता असतानाही येथील तृतीय व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना "बीएमओ" कामांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बोलवण्यात आल्याने प्रयोगशाळा व ग्रंथालय बंद असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांना प्रयोगासाठी आवश्यक असलेले उपकरणे व साहित्य मिळत नसून आता येथील प्राध्यापकांना अध्यापनाऐवजी कारकूनी कामे करावी लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे. चौकशीच्या अनुषंगाने येथील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील सदरील कामे न देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) जिल्हाधिकारी नागपूर कार्यालयाकडून शासकीय विज्ञान संस्थेतील काही कर्मचाऱ्यांच्या सेवा मतदार याद्यांच्या कामासाठी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत. तथापि, उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून प्रयोगशाळा व ग्रंथालयातील कामे करण्यात येत असल्याने, प्रयोगशाळा व ग्रंथालय बंद नाहीत.
(२) हे खरे नाही.
(३) मतदार याद्यांच्या कामासाठी सेवा अधिग्रहीत करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना परत पाठविण्याची विनंती जिल्हाधिकारी, नागपूर यांना करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांना १०० टक्के अनुदान मंजूर करणेबाबत

**(४१) * १५२१० श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत खाजगी विनाअनुदानित १०४ शाळांना १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरू करणेबाबत आणि खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना एमईपीएस आणि ग्रँट इन कोड लागू करणेबाबतची मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राह्य धरले जाणार नसल्याचे आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक ७ जुलै, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणावरील मान्य बाबींवरील खर्च भागविण्यासाठी ५० टक्के अनुदान अनुज्ञेय असून ते देण्याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत खाजगी विनाअनुदानित व खाजगी प्राथमिक अनुदानित शाळेतील शिक्षकांना १०० टक्के अनुदान देऊन एमईपीएस आणि ग्रँट इन कोड लागू करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या क्षेत्रात मान्यता दिलेल्या खासगी प्राथमिक शाळांना यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राहय धरले जाणार नसल्याचे दिनांक १३/१/२००४ च्या पत्रान्वये आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या थकीत अनुदानाची रुपये १९७.६२ कोटी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षकांना शाळा अनुदान सहाय्य-१९६८ मधील तरतूदी लागू आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(४२) * १५७८१ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिक्षकांची ६७ हजार ७५५ रिक्त पदे भरण्याचा प्रस्ताव शिक्षण आयुक्तांकडून शालेय शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हा प्रस्ताव आर्थिक भार असल्याचे कारण देवून प्रलंबित ठेवण्यात आला असल्यामुळे शिक्षण क्षेत्रातून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शासनाने या प्रस्तावावर निर्णय घेऊन शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) खरे आहे.
(२) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यास मान्यता मिळण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता.त्यावर वित्त विभागाने, काही मुद्दे उपस्थित करुन त्याबाबत स्पष्टीकरण व माहितीसह प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने आयुक्त (शिक्षण), पुणे यांच्याकडून वित्त विभागाकडून उपस्थित मुद्यांबाबतचे स्पष्टीकरण व माहिती प्राप्त होण्यास काही अवधी जाणार असल्याने, सद्य:स्थितीत पद भरतीबाबतची आवश्यकता पाहता, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या रिक्त पदांपैकी ५० टक्के रिक्त पदे भरण्यास मान्यता मिळण्याबाबत व उर्वरित ५० टक्के रिक्त पदे मुद्यांबाबतची माहिती प्राप्त होताच, सादर करण्यात येईल याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास फेरसादर करण्यात आला आहे.

(३) सन २०१७ मध्ये शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीद्वारे निवड झालेले उमेदवार पवित्र प्रणालीमार्फत भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उत्तीर्ण उमेदवारांची शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी फेब्रुवारी २०२३ मध्ये आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्याचे नियोजित आहे.

तसेच राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यास परवानगी मिळण्याबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व अनुदानाच्या रकमेवर बँकेकडून बॅक चार्जेस व जीएसटी आकारले जात असल्याबाबत

**(४३) * १५१०२ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शिष्यवृत्ती व अन्य काही लाभांच्या योजनेपोटी (उपस्थिती भत्ता, खिचडी, अनुदान) प्राप्त होणाऱ्या अत्यंत नाममात्र अनुदानाच्या रकमेवर बँकेकडून बॅक चार्जेस व जीएसटी आकारले जात असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर मधील काटोल तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा वलनी डप्फर येथील २८ विद्यार्थ्यांच्या खात्यावर ही रक्कम जमा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आधीच नाममात्र असलेल्या अनुदानातूनही रक्कम कपात होत असल्याने पालकांकडून संताप व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने संबंधित दोषींवर व दोषी शाळांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

प्रधान मंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या अनुषंगाने केवळ एक वेळ विशेष योजना म्हणून सन २०२१ च्या उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत पात्र लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण स्वरुपात लाभ देताना काही बँकांकडून सदरप्रमाणे शुल्क आकारणी केली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) व (५) सदरप्रमाणे योजनेचा लाभ लाभार्थ्यांना अदा करताना शुल्क न आकारण्याचे निर्देश प्राथमिक शिक्षण संचालनालयाने दिलेले आहेत.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(४४) * १५९३३ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुरेश धस, श्री.बाळाराम पाटील, श्री.किरण सरनाईक, श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना १०,२०,३० वर्षांच्या सेवेनंतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे आश्वासित प्रगती योजना लागू करण्याकरीता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडून संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येत आहे, तसेच सातव्या वेतन आयोगाच्या तरतुदीप्रमाणे आश्वासित प्रगती योजना ही (१०:२०:३०) जिल्हा परिषद शिक्षकांना लागू करण्याची तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय चतुर्थश्रेणी कर्मचारी, महाविद्यालयीन चतुर्थश्रेणी कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने २४ वर्षांनंतर आश्वासित प्रगती योजना शासनाने लागू केली असून या योजनेचा लाभ खाजगी अनुदानित माध्यमिक शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिला जात नाही, तसेच १ जानेवारी २००४ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांसाठी व अर्धवेळ म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांना किमान सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ मिळत नाही, तसेच अर्धवेळ म्हणून नियुक्त असलेले शिक्षक पूर्ण वेळ पदाएवढे काम करीत असल्याने त्यांना १२ वर्षांनंतरही पूर्ण वेळ शिक्षकांप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्याची मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी अनुदानित शाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांसाठी तीन लाभांची सुधारित आश्वासित प्रगती योजना लागू करणे तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याच्या अनुषंगाने वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला त्याची सद्यःस्थिती काय आहे,

(४) असल्यास, सातव्या वेतन आयोगाच्या अधिसूचनेमध्ये चटोपाध्याय समितीने शिफारस केलेल्या वरिष्ठ वेतनश्रेणीबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख केला नसल्यामुळे मूळ वेतनात ज्येष्ठ शिक्षकांप्रमाणे रुपये ३५९८ इतकी वाढ अपेक्षित असताना ती फक्त रुपये ७०० इतकीच होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार राज्यातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०-२०-३० वर्षांनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत तसेच दिनांक १ जानेवारी, २००४ नंतर सेवेत आलेल्या शिक्षकांना किमान सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.

(४) व (५) याबाबत वित्त विभागाने राज्य व इतर पात्र कर्मचाऱ्यांना राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ (बक्षी समिती) ने विहीत केलेली "वेतन मॅट्रिक्स वेतनसंरचना" मा.मंत्रीमंडळाच्या मान्यतेने स्विकृत करण्यात आली असून, दर वेतन आयोगामध्ये वेतन सुधारणा समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने एखादया संवर्गाची वेतननिश्चिती करताना, त्यावरील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीचा कमी किंवा अधिक लाभ मिळू शकतो. तसेच एका संवर्गाकरीता वेतनस्तर/पे मॅट्रीक्स संरचना बदलता येणार नाही, असे अभिप्राय दिले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण व अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी गेल इंडिया कंपनीच्या पाईपलाईन करीता संपादीत करुन मोबदला देण्याबाबत

**(४५) * १६०५९ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, पेण व अलिबाग तालुक्यांतील गावांमधील शेतकऱ्यांच्या जमिनीमधून गेल इंडिया लिमिटेड कंपनीची पेट्रोलियम व खनिज पाईप लाईन जाणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल इंडिया लिमिटेड कंपनीने सदर शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून पेट्रोलियम व खनिज पाईप लाईन टाकण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत न करता पाईपलाईन टाकण्यात येत असल्याने उक्त शेतजमीन व आजुबाजूची शेतजमीन लागवडी योग्य राहणार नसल्यामुळे तेथील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला विरोध दर्शविला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार सदर कंपनीने पेट्रोलियम व खनिज पाईपलाईन टाकण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत करुन त्यांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.उदय सामंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल व अलिबाग तालुक्यातील गावामधून सदरची पाईपलाईन जात आहे. सदर पाईपलाईनचे काम पेट्रोलियम व खनिज पाईपलाईन कायदा, १९६२ अन्वये करण्यात येत आहे. या पाईपलाईन करीता १५ मीटर रुंदीच्या जमिनीच्या पट्ट्याचे वापराचे हक्क संपादन करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सदर कार्यवाही सुरु झाल्यानंतर प्रत्यक्ष पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. तद्नंतर जमीन पूर्ववत करुन दिल्यानंतर शेतकरी पुन्हा लागवडी करु शकतील. तसेच हक्क संपादन करण्यात आलेल्या क्षेत्रातूनच पाईपलाईनचे काम करण्यात येत असल्यामुळे जमीन लागवडी योग्य न राहण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) पेट्रोलियम व खनिज पाईपलाईन कायदा, १९६२ मधील तरतूदींनुसार हक्क संपादित जमिन, पिके, फळझाडे व वनझाडे इत्यादीबाबतची भरपाई शेतकऱ्यांना अदा करण्यात येणार आहे.

-----------------

## निंबाळकर वस्ती ते दूरगांव (ता.कर्जत, जि.अहमदनगर) दरम्यानच्या बंधाऱ्यावर असणारा पूल धोकादायक असल्याबाबत

**(४६) * १५७६४ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निंबाळकर वस्ती ते दूरगांव (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील बंधाऱ्यावर असणारा पूल धोकादायक बनला असून कमी रुंदीच्या पुलामुळे शाळकरी विद्यार्थी, ग्रामस्थ, शेतकऱ्यांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामस्थांनी वेळोवेळी शासनाकडे पाठपुरावा करुन देखील पुलाचे काम अद्याप अपुर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन नवीन पूल बांधण्यात येणार आहे काय, तसेच सदर नवीन पूल केव्हापर्यंत बांधण्यात येणार आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) प्रश्नांकित रस्ता तसेच त्यावरील पूल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येत नाही.
(३) व (४) प्रश्नांकित रस्ता हा अवर्गीकृत रस्ता असल्याने तो या विभागाच्या अखत्यारीत येत नाही.
त्यामुळे भविष्यात हा रस्ता दर्जोन्नत झाल्यानंतर, रस्त्याच्या दर्जानुसार सदर रस्त्याचे काम निकष, मंजुरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील विधी विभागाच्या परीक्षांचे निकाल जाहीर करण्याबाबत

**(४७) * १५३८१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातील एल.एल.एम.च्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या प्रथम सत्र व तृतीय सत्राच्या परीक्षांचे निकाल पाच महिने झाले असूनही अद्याप जाहीर करण्यात आले नसल्याने विद्यार्थी प्रचंड तणावाखाली असल्याची बाब दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, तदनुषंगाने मुंबई विद्यापीठातील विधी विभागाच्या सत्र परीक्षांचे निकाल तातडीने जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) व (३) एल.एल.एम. हिवाळी सत्र २०२१ च्या प्रथम व द्वितीय वर्षातील प्रथम व तृतीय सत्राच्या परीक्षा कोविड २०१९ च्या प्रादुर्भावाने विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयीन स्तरावर घेण्यात आल्या होत्या. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी वेगवेगळ्या तारखांना परीक्षा घेतल्या. मुंबई विद्यापीठाच्या विधी विभागाच्या एल.एल.एम.च्या परीक्षा दिनांक ६ जून, २०२२ रोजी संपल्या. परंतु, महाविद्यालयांकडून व विद्यापीठाच्या विधी विभागाकडून पोर्टलवर विहित मुदतीत गुण भरण्यात न आल्याने विहित मुदतीत एकत्रित निकाल जाहीर करण्यास विलंब झाला.

दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ व २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी एल.एल.एम.च्या प्रथम सत्र व तृतीय सत्राचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल विहित वेळेत जाहीर होण्याकरीता विद्यापीठाने बदललेल्या प्रक्रियेची महाविद्यालयांनी काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना सर्व महाविद्यालयांना विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## राज्यातील सुतगिरण्या आर्थिक संकटात असल्याबाबत

**(४८) * १५९०७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६२६ ला दिनांक १९ मार्च, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासनाने १४० सहकारी सुतगिरण्या अर्थसहाय्याकरिता घेतल्या असून १३६ सहकारी सूतगिरण्यांना रुपये १,९५,३१५.३६ लाख इतके शासकीय भाग भांडवल उपलब्ध करुन देऊनही २९ सुतगिरण्या अवसायनात व ७ सुतगिरण्या बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कापसाचे घटलेले उत्पादन व कापसाचे वाढलेले भाव यामुळे राज्यातील १०० हुन अधिक सुतगिरण्या आर्थिक संकटात सापडल्या असून ३० सुतगिरण्या बंद पडल्या आहेत तसेच काही सुतगिरण्यांमध्ये ३० टक्के क्षमतेने उत्पादन सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वस्त्रोद्योग महामंडळाला किफायतशीर दरात कापूस उपलब्ध होत नसल्याने सुतगिरण्यांनी गत सात, आठ महिन्यात खरेदी केलेल्या कापसावर १० टक्के नुकसान भरपाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन निर्णय दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ अन्वये सन २०१८-२०२३ करिता राज्यात लागू करण्यात आलेले नवीन वस्त्रोद्योग धोरण अंमलबजावणीबाबत सद्य:स्थितीत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने राज्यातील सुतगिरण्या पूर्ण क्षमतेने चालु राहण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात शासनाने १४१ सहकारी सुतगिरण्या अर्थसहाय्याकरिता घेतल्या असून त्यापैकी १३८ सूतगिरण्यांना रुपये १९७८९०.१३ लाख शासकीय भांडवल उपलब्ध करून दिलेले आहे. यापैकी २८ सुतगिरण्या अवसायनात आहेत व ५ सुतगिरण्या बंद आहेत.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात वाढलेले कापसाचे दर व त्यामानाने सुतास दर न मिळणे यामुळे १३ सहकारी सुतगिरण्यांनी तात्पुरते सूत उत्पादन बंद केलेले आहे. तसेच काही सुतगिरण्यांनी तोटा कमी करण्याच्या उद्देशाने उत्पादन क्षमता तात्पुरती कमी केलेली आहे.

(३) महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महासंघ मर्या. मुंबई यांनी दिनांक २४/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये सहकारी सुतगिरण्यांनी खरेदी केलेल्या कापूस गाठीवर १०% खरेदी अनुदान मंजूर करण्याबाबत विनंती केलेली आहे.

(४) वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२०२३ ची अंमलबजावणी राज्यात सुरु आहे.

(५) व (६) सन २०२३-२८ या कालावधीसाठीचे नवीन वस्त्रोद्योग धोरण संदर्भात उपाययोजना सुचविण्यासाठी आयुक्त, वस्त्रोद्योग यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ नुसार समिति गठीत करण्यात आलेली आहे.

-----------------

## काटेपिंपळगाव ते शंकरपूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील शिवना नदीवरील पूल वाहून गेल्याबाबत

**(४९) * १५३३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेपिंपळगांव ते शंकरपूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील राज्यमार्ग-२१६ या रस्त्याच्या व रस्त्यावरील पुलाच्या कामाला सन २०२० मध्ये मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे व पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने सदर पूल शिवना नदीच्या पाण्यात वाहून गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काटेपिंपळगांव लगतच्या अर्धवट पुलाची दुरवस्था झाल्याने ग्रामस्थ व शाळकरी मुला-मुलींना जाण्या-येण्यासाठी रस्ता नसल्याने अडचणींचा सामना करावा लागत असून त्याबाबत ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा केला, आंदोलने आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर रस्त्यावर कि.मी. ४०/०० मधील शिवना नदीवर पुलाची दुरुस्ती करणे हे सन २०१७-२०१८ मध्ये मंजूर काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कि.मी. ३९/५०० ते ४०/५०० मध्ये मंजूर डांबरीकरणाचे काम प्रगतीत असून डिसेंबर, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) ऑक्टोबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे सदर पुलाचा एक बाजूचा पोच मार्ग क्षतीग्रस्त झाला होता, हे खरे आहे.

सदर पोच मार्गाची दुरुस्ती करण्यात आली असून सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस सुरळीत करण्यात आला आहे.

सदर ठिकाणी जुलै, २०२२ मध्ये मोठ्या पुलाचे बांधकाम करणे याकरीता रुपये १२ कोटीचे काम मंजूर असून संकल्पने, अंदाजपत्रक व निविदा बाबत कार्यवाही पूर्ण करुन काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) व (४) कोटपिंपळगांव ते खडक वागलगांव शिंजी प्रजिमा-२७ या रस्त्यावर कि.मी.४८/३०० येथे मंजूर नळकांडी पुलाचे काम प्रगतीत असून, सदरचे काम डिसेंबर, २०२२ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) * १५२३३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे : दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ९९०१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासन विभागाचा कार्यभार केवळ ८ हजार ५९७ कर्मचाऱ्यांवर अवलंबून असून अन्न व औषध प्रशासनाच्या बहुतांश कार्यालयांमध्ये निम्यापेक्षा कमी क्षमतेने कर्मचारी कार्यरत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या खात्यांतर्गत हजारो कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या ८० टक्के जागा रिक्त आहेत तसेच सन २०१७ नंतर आजतागायत कोणतीही पदभरती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाद्यांन्नाची तपासणी करण्यासाठी या खात्याकडे संपूर्ण राज्यासाठी मिळुन मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद ह्या ३ प्रयोगशाळा उपलब्ध असून मुंबईच्या प्रयोगशाळेत ११४ पदांपैकी ५० आणि औरंगाबादच्या प्रयोगशाळेत ४० पदांपैकी १२ रिक्त पदे आहेत, त्याचप्रमाणे ४१ कर्मचारी क्षमतेच्या नागपूरच्या प्रयोगशाळेत एकही पूर्णवेळ कर्मचारी उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रत्येक प्रयोगशाळेकडे प्रतीदिन खाद्यांन्न आणि औषधांचे ५०० ते ६०० नमुने तपासणीसाठी येत असून कर्मचाऱ्यांअभावी आलेल्या प्रत्येक नमुन्यांची वेळोवेळी तपासणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

अन्न व औषध प्रशासनातील १२७१ पदांचा सुधारित आकृतिबंध दिनांक ०४/०९/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेला आहे

(२) अन्न व औषध प्रशासनात सद्य:स्थितीत गट-अ व गट-ब संवर्गांत मिळुन एकूण ७९७ पदे मंजूर असून त्यापैकी ३९४ पदे रिक्त आहेत.

तथापि, सन २०१७ नंतर अन्न व औषध प्रशासनात सहायक आयुक्त (औषधे) संवर्गातील ०९ पदे व औषध निरीक्षक संवर्गांतील १४ पदे नामनिर्देशनाने भरण्यात आलेली आहेत.

(३) हे अंशतः खरे आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या नागपुर येथील प्रयोगशाळेसाठी ४१ पदे मंजूर असून त्यातील २६ पदे सद्य:स्थितीत भरलेली आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) अन्न व औषध प्रशासनातील रिक्त पदे पदोन्नतीने व सरळसेवेने भरण्याबाबतची कार्यवाही विविध स्तरावर सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मेसर्स सुयोग टेलिमॅट्रिक्स लि.या कंपनीला दिलेल्या कंत्राटांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५१) * १५४५३ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मेसर्स सुयोग टेलिमॅट्रिक्स लि.या कंपनीला टेलिकॉम बीटीएस अँटेना उभे करण्यासाठी मुंबई व उपनगरातील सर्व उड्डाणपूल सन २००८-२००९ पासून भाडेतत्वावर देण्यात आलेले असून त्याचे रुपये ४० कोटी भाडे अद्यापी मे.सुयोग या कंपनीकडून महामंडळास प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करारनामे न करताच मे.सुयोग कंपनीस कंत्राट देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मे.सुयोग कंपनीला दिलेले कंत्राट संपल्यानंतर पुन्हा नव्याने कंत्राट देताना मागील थकबाकी भरलेली नसतानाही त्यांना पुन्हा नव्याने कंत्राट देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्‌नुषंगाने याप्रकरणी झालेल्या व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनयिमितता व भ्रष्टाचार झालेला असल्याने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली व थकबाकी जमीन महसूलाप्रमाणे वसूल करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

अद्यापपर्यंत मे.सुयोग टेलिमॅटिक्स लि.यांची एकूण थकबाकी रक्कम रुपये ४०,५९,३५,९७२/- इतकी आहे.

(२) हे खरे नाही.

सन-२००८ साली देण्यात आलेल्या कंत्राटाचा करारनामा करण्यात आला. तथापि, सन २०१७ मधील निविदा प्रक्रियेमध्ये पुन:श्च मे.सुयोग टेलिमॅट्रिक्स लि. याच कंपनीने ३२९ खांबांसाठी निविदा भरली. त्याअनुषंगाने सदर कंपनीस Letter of Acceptance (LoA)देण्यात आला. कंपनीने LoA च्या तरतूदीची पूर्तता देखील केली. पूर्वीच्या कंत्राटामधील मासिक मुदतवाढीची रक्कम भरुन त्वरित करारनामा करण्याबाबत कंपनीस कळविण्यात आले होते. मे.सुयोग ने सदर रक्कम भरली नाही व कालांतराने ३२९ ऐवजी २५४ खांबांचेच निविदा दराप्रमाणे महसूल घ्यावा अशी विनंती करुन विवाद निर्माण केला. त्यामुळे सदर कंत्राटाप्रकरणी करारनामा होऊ शकला नाही.

(३) अंशत: खरे आहे.

सन-२००८ साली देण्यात आलेल्या कंत्राटाचा करारनामा करण्यात आला होता, तथापि, त्यानंतर सन-२०१७ मधील निविदा प्रक्रिया पुन:श्च मे.सुयोग टेलिमॅट्रिक्स लि. याच कंपनीसोबत केली होती मात्र, कंपनीने पूर्वीच्या कंत्राटामधील मासिक मुदतवाढीची रक्कम भरली नसल्याने व निविदेतील अटी व शर्ती पूर्ण न केल्याने करारनामा करण्यात आला नाही.

(४) सदर प्रकरणी थकबाकी भरण्याच्या अनुषंगाने नोटीसा दिल्यानंतर देखील मे.सुयोग टेलिमॅट्रिक्स लि. यांची पूर्ण रक्कम न भरल्याने त्यांच्या सर्व उपकरणावर डिस्क कनेक्शनची कारवाई करण्यात आली. व्याजासह थकबाकी वसुलीसाठी मे.सुयोग टेलिमॅटिक्स लि. यांच्या विरोधात मा.उच्च न्यायालयात (Recovery Suit) दाखल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-सातारा महामार्गाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(५२) * १५८३४ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड : तारांकित प्रश्न क्रमांक ११३६९ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुणे-सातारा महामार्गाचे रुंदीकरण करण्याचे काम दहा वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे-सातारा महामार्गाच्या सहापदरीकरण प्रकल्पाच्या एकूण १४०.३५० कि.मी.लांबीपैकी सुमारे १३५.६८ कि.मी. मधील सहापदरीकरणाचे काम काही स्ट्रक्चर्स व त्यांचे जोडरस्ते वगळता पूर्ण करण्यात आले असून उर्वरीत ५.२८२ कि. मी. चे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने अनेक दुर्घटना घडत असतानाही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे-सातारा महामार्गाची सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी तसेच अपघात टाळण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सवलत करारानुसार प्रकल्प पूर्ण होण्याची नियोजित तारीख ३० मार्च, २०१३ होती. परंतु खालील कारणांमुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होवू शकला नाही.

१) जमीन हस्तांतरित करण्यास विलंब

२) सेवा वाहिन्या स्थलांतरीत करतांना आलेल्या अडचणी

३) अतिरिक्त सुविधांसाठी जनतेची वारंवार मागणी

४) महामार्गाच्या हद्दीतील अतिक्रमणे काढणे

५) स्थानिकांकडून काम थांबवणे

६) रस्त्याच्या हद्दीतील धार्मिक स्थळांचे स्थलांतर करताना आलेले अडथळे.

७) भुयारी मार्गाचे ठिकाण व रुंदी मध्ये बदल करण्याची स्थानिकांकडून मागणी

८) मागील २ वषापूवी कोवीड प्रभावामुळे काम चालु ठेवण्यास अडचणी

सद्य:स्थितीत महामार्ग सुस्थितीत असून वेळोवेळी देखभाल दुरुस्ती केली जाते. पुणे सातारा महामार्गाचे बहुतांशी काम ३०/०४/२०२२ रोजी पूर्ण झाले आहे.

(२) पुणे-सातारा महामार्गाचे १३७.६६ कि.मी. काम पूर्ण झाले असून उर्वरीत २.६९ कि.मी.लांबीत खालील ठिकाणी काम पूर्ण करण्यासाठी अडचणी आहेत.

(अ) शिंदेवाडी, जि.सातारा (७९६.५० कि.मी.) येथील उड्डाणपुलाच्या पोहोच मार्गातील अतिक्रमण काढण्यास स्थानिकांचा विरोध असल्यामुळे रस्त्याच्या कामास विलंब झाला. सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे.

(ब) किकवी, ता.भोर (कि.मी.८०१.१०५) शिवरे, जि.पुणे (कि.मी. ८१७.३७) व खेड शिवापूर, जि.पुणे (कि.मी.८२०.३२) येथे स्थानिकांनी कामास विरोध केला व त्यांनी पूर्व नियोजित असलेल्या पादचारी भुयारी मार्ग/पादचारी उड्डाणपुलाऐवजी तेथे वाहन भुयारी मार्ग (व्ही.यु.पी.) ची मागणी केल्यामुळे सदरचा सुधारित प्रस्ताव भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे वरिष्ठ कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. सदर मंजुरी प्राप्त झाल्यानंतर प्रलंबित कामे सुरु करण्यात येतील.

(३) महामार्गाच्या दोन्ही बाजूस नागरीकिकरण वाढल्यामुळे सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूस नागरीकांनी भराव केल्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडचण होते. त्यामुळे बऱ्याच ठिकाणचे सेवा रस्ते खराब होतात. सद्य:स्थितीत रस्त्यावरील सर्व खड्डे भरण्यात आलेले असून रस्ता वाहतूकीसाठी सुस्थीतीत ठेवण्यात आलेला आहे.

(४) महामार्गावर आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध आहेत. अपघात स्थानी विना विलंब सुविधा उपलब्ध होण्यासाठी रस्त्याची देखभाल व दुरुस्ती चांगल्या प्रकारे करुन रस्त्याच्या हद्दीतील अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही पोलीस यंत्रणेच्या मदतीने युध्दपातळीवर करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना अल्पदरात गहू देण्याची योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(५३) * १६२६३ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील ४ लाख शेतकऱ्यांना अल्पदरात गहू देण्याची योजना गत सहा महिन्यांपासून बंद असल्याने लाभार्थी हवालदील झाले असल्याची बाब दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांना पंतप्रधान गरीब कल्याण योजनेचा देखील लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने राज्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांमधील ४ लाख शेतकऱ्यांना अल्पदरात गहू देण्याची योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) एपीएल (केशरी) शिधापत्रिकाधारक शेतकरी लाभार्थ्यांसाठी उचल करीत असलेल्या Non-NFSA योजनेंतर्गत गहू उपलब्ध होणार नसल्याचे भारतीय अन्न महामंडळाने त्यांच्या दिनांक ३१/०५/२०२२ च्या पत्रान्वये कळविले असल्याने शेतकरी योजनेंतर्गत गहू उपलब्ध झालेला नाही.

(२) हे खरे आहे.

शेतकरी योजनेतील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत मोफत अन्नधान्याचा लाभ अनुज्ञेय नाही.

(३) शेतकरी योजनेंतर्गत आवश्यक अन्नधान्याची खरेदी खुल्या बाजारातून करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारामुंबरी खाडीवरील इळये-वरंडवाडी ते जामसंडे-वळकू-पाटेथरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) पुलाचे काम पूर्ण करणेबाबत

**(५४) * १५१८३ श्री.प्रसाद लाड : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १८ मधील प्रश्न क्रमांक १३००६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारामुंबरी खाडीवरील इळये-वरंडवाडी ते जामसंडे-वळकू-पाटेथरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे पूल उभारण्यात यावा, जोडरस्ते तयार करण्यात यावेत, या मागणीसाठी या परिसरातील अनेक गावातील ग्रामस्थांच्या २५ वर्षांहून अधिक कालावधीपासूनच्या मागणीला अनुलक्षून तत्कालीन शासनाने या पुलास मंजूरी देऊन रुपये १५ लाखाची अर्थसंकल्पात तरतूद केल्यानंतरही सदरहू पुलाच्या उभारणीचे कामास सुरूवातच झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुलाचे पाया व इतर डिझाईनसाठी आवश्यक असलेल्या चाचणी रंध्रे घेण्याचे कामासाठी निश्चित केलेल्या ठेकेदारांकडून रंध्रे प्राप्त होऊन पुलाचे संकल्पन, संकल्प चित्र मंडळाकडून प्राप्त करून घेऊन, पुलाचे बांधकाम, पुलाचे जोडरस्ते व त्यासाठी लागणाऱ्या जागेचे भूसंपादन यांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ठिकाणी पूल उभारणीस व जोड रस्त्याचे कामास होत असलेल्या विलंबामुळे पूल उभारणीचे काम व जोडरस्त्याच्या कामाच्या अंदाजित खर्चात वाढ होत असून पूल व जोड रस्त्याअभावी ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सदरहू पूलाच्या उभारणीचे काम विनाविलंब सुरू होऊन पूल वाहतूकीसाठी लवकरात लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) होय, हे खरे आहे.

सदर पुलाकरीता सन १९९९-२००० मध्ये रक्कम रुपये १९.९० लक्षचे काम मंजूर होते. तथापि, सदर खाडीवर २२० मी. पूल बांधणे गरजेचे असल्याने या रक्कमेत पूल बांधणे सुसाध्य नसल्याने सदरचे काम अर्थसंकल्पातून वगळण्यात आले.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) सदर रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा असून एकूण लांबी ३ कि.मी आहे. अस्तित्वातील २.३५० कि.मी. लांबी संबंधित देवगड-जामसंडे नगर पंचायतकडे आहे, १.२०० कि.मी. योजनाबाहय रस्ता, ४०० मी.खारलँण्ड बंधारा व सर्वसाधारणपणे २५० मी. खाडीक्षेत्र आहे.

प्रस्तवित पुलाच्या जोडरस्त्याकरीता भुसंपादन करणे आवश्यक आहे. त्याकरीता रक्कम रुपये ३.५० कोटीचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीस सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर भुसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन व आवश्यक परवानगी प्राप्त करुन निधी निकष व प्राधान्य क्रमानुसार पुलाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एकदरा पुलाची (ता.मुरुड, जि.रायगड) दुरुस्ती करण्याबाबत

**(५५) * १५३९१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आगरदांडा व राजापूरीसह अनेक गावांना जोडणाऱ्या एकदरा पुलाची (ता.मुरूड, जि.रायगड) दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे ६५ वर्षांपूर्वी हा पूल मुरूड-एकदरा खाडीवर बांधणेत आलेला असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून गेल्या ३० वर्षांत सदर पुलाची दुरूस्ती करण्यात आली नसल्यामुळे पूल धोकादायक झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या बीमचे प्लास्टर निखळले असून अनेक ठिकाणी गंजलेल्या सळया दिसू लागल्या आहेत तर संरक्षक कठडेदेखील मोडकळीस आले आहेत, सदर पुलावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असून महाडच्या सावित्री पुलासारखी भयंकर दुर्घटना घडून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने गेली ३० वर्षे पुलाची दुरुस्ती न करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच सदर पूलाच्या दुरूस्तीसाठी अथवा त्या ठिकाणी नवीन पूल बांधण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना व कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

पूलाच्या काही घटकांचे क्रॉक्रिट नादुरुस्त झाले आहे. तथापि, पूल वाहतूकीस सुरळीत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर पुलाच्या दुरुस्तीची रक्कम रुपये ५०० लक्षचे काम मंजूर आहे. अंदाजपत्रक व निविदा विषयी कार्यवाही पूर्ण करुन दुरुस्तीचे काम लवकरच कार्यान्वित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळत नसल्याबाबत

**(५६) * १५६१६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ११११२१ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना राज्य शासनाकडून ५० टक्के तर महानगरपालिकेकडून ५० टक्के अनुदान देण्याचा निर्णय झालेला असताना या शाळांना अनुदान मिळत नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे या शाळांमधील सुमारे ५०० पेक्षा जास्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातील खाजगी विनाअनुदानित शाळांना अद्याप अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, तातडीने अनुदान वितरित करून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मंत्रिमंडळाच्या दिनांक २४/११/२००१ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या खाजगी प्राथमिक शाळांना यापुढील कालावधीत राज्य शासनाच्या ५० टक्के अनुदानासाठी ग्राहय धरले जाणार नसल्याचे शासन पत्र, दिनांक १३/०१/२००४ च्या पत्रान्वये आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविले आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या थकीत अनुदानाची रुपये १९७.६२ कोटी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता, जळगाव यांचे कार्यक्षेत्रातील बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(५७) * १५२६७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता,जळगाव यांचे कार्यक्षेत्रातील सन २०१७-१८ या वर्षात ई-निविदा क्र. २१ मधील मक्तेदारांच्या निविदा निकषानुसार अपात्र ठरवून पुन्हा त्याच मक्तेदारांस त्याच कागदपत्राचे आधारे सन २०१८ मध्ये ई-निविदा २७ नुसार तीच कामे वाढीव दराने देण्यात आली तसेच श्री.प्रशांत सोनवणे, प्रभारी अधीक्षक अभियंता, जळगाव यांचे कालखंडात झालेली रस्ता बांधकामे निकृष्ट दर्जाची झाली आहेत अशी तक्रार दिनांक ११/१०/२०२२ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदेमध्ये व निकृष्ट् बांधकामामध्ये केलेला भ्रष्टाचार संगनमताने दडपण्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधी यांनी दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजी तत्कालीन मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने ई-निविदामध्ये व निकृष्ट दर्जाच्या रस्ते बांधकामात केलेल्या भ्रष्टाचाराबाबत संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) होय, अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(३) सन २०१७-१८ च्या ई-निविदा संदर्भातील तक्रारींबाबत चौकशी करण्यात आली असता, तक्रारीमध्ये तथ्य आढळून आलेले नाही. अन्य तक्रारींबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नाशिक यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी अनुदान मिळणेबाबत

**(५८) * १५६५५ श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याकरीता शाळेमध्ये विविध सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी लागणारे अनुदान मागील दोन वर्षापासून देण्यात आले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करणे व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(५९) * १५५४९ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मानसिक तणावामुळे हजारो विद्यार्थी आत्महत्या करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास आधुनिक जीवन पध्दतीमुळे निर्माण होणाऱ्या कौटुंबिक समस्या आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे मागील वर्षी जवळपास १८३४ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना व कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) याबाबत शासनाने महाकरिअर पोर्टल सुरू केलेले आहे. समुपदेशकांची सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. वेबिनार मालिकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. राज्यातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा पूर्व कालावधी, परीक्षा दरम्यानचा कालावधी, परीक्षा नंतरचा कालावधी

व परीक्षेच्या निकालानंतरचा कालावधी या दरम्यान मोफत स्वरूपात मार्गदर्शन व समुपदेशन सेवा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातंर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(६०) * १५४३९ श्री.कपिल पाटील, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातंर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या शिक्षकांना शासन निर्णयानुसार प्रति तास रुपये २०० ते ३०० मानधन देणे, सदर मानधन नियमित न देता वर्षाच्या शेवटी दिल्यामुळे त्यांची आर्थिक अडचण निर्माण होणे, तासिका तत्वावरील शिक्षकांना सुट्टीमध्ये काम केल्याचा पगार न देणे, शिक्षक कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत (डिसीपीएस) वेतनातून वार्षिक कपात केल्याचा हिशोब न मिळणे, यामध्ये शासनाच्या हिश्श्याची स्पष्टता नसणे, अर्धवेळ शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू न करणे, अर्धवेळ शिक्षकांना वाढत्या वयाची तरतूद व संरक्षण म्हणून निवृत्तीवेतन व सेवानिवृत्तीलाभ आणि घरभाडे, शहर, वाहन भत्ता, प्रवास भत्ता या आणि अन्य मागण्या बुक्टू संघटनेने केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कनिष्ठ महाविद्यालय/ संस्थांमध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांच्या मानधनात अद्याप वाढ न झाल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तसेच बुक्टू संघटनेने केलेल्या मागणीच्या अनुषंगाने व शासकीय कनिष्ठ महाविद्यालय/संस्था मध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांच्या मानधनात वाढ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मात्र, दिनांक २२/१०/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/ संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनाच्या दरात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांना मानधन अदा करण्यात येत आहे.

तासिका तत्वावरील अध्यापकांची मानधन अदायगी विहित कालावधीत होणेसाठी दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीकरीता कार्यपध्दती निश्चित करुन कालबध्द कार्यक्रमानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तासिका तत्वावरील शिक्षकांना सुट्टीमध्ये काम केल्याचा पगार न देण्यासंदर्भात तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

मुंबई विद्यापीठातंर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांना अंशदान निवृत्तीवेतन योजनेंतर्गत (डिसीपीएस) पावत्या संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत असून यामध्ये कर्मचाऱ्यांचा व शासनाचा हिस्सा स्पष्टपणे नमूद करण्यात आला आहे.

अर्धवेळ शिक्षकांना दिनांक २६/०८/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये सातवा वेतन लागू करण्यात आला असून त्यानुसार विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण कार्यालयाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. अर्धवेळ शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय पूर्णवेळ शिक्षकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे आहे. तसेच शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दिनांक ११/१२/१९९९ व दिनांक ०७/०९/२००१ नुसार अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ कर्मचाऱ्यास अनुज्ञेय वेतनाच्या निम्मे वेतन व महागाई भत्ता देण्यात येत असून घरभाडे व प्रवास भत्ता देण्याची तरतूद नाही.

(२) व (३) शासन निर्णय, दिनांक २२/१०/२०२१ अन्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय कनिष्ठ महाविद्यालय/संस्थांमध्ये घड्याळी तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या कनिष्ठ अधिव्याख्याता यांच्या मानधनाच्या दरात वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधितांना मानधन अदा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळा सोडणाऱ्या मुलांची शैक्षणिक गळती रोखण्याबाबत

**(६१) * १५७७८ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारच्या २०१७-१८ च्या सॅम्पल सर्वेनुसार महाराष्ट्रात शाळा सोडणाऱ्यांचे प्रमाण मोठे असून शाळा सोडणाऱ्या मुलांच्या एकूण संख्येपैकी ८३ टक्के मुले प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षण सोडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यात अनुसूचित जाती-जमाती, मुस्लीम आणि कमी उत्पन्न गटातील मुलांचे प्रमाण सर्वाधिक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुसार माहिती घेवून राज्यातील या मुलांची शैक्षणिक गळती रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शासनामार्फत विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीने पुढील योजना राबविल्या जातात.

- समग्र शिक्षा अभियानांतर्गत इ. १ ली ते ८ वीच्या शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळातील सर्व मुली, अनुसूचित जातीची मुले, अनुसूचित जमातीची मुले, दारिद्र्य रेषेखालील पालकांची मुले या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेष वाटप योजना लागू आहे.

- सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात.
- सर्व विद्यार्थ्यांसाठी शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते.
- तसेच ३ ते १८ वयोगटातील शाळाबाह्य मुलांचे सर्वेक्षण करून शाळाबाह्य आढळून आलेल्या बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले जाते. वरील योजना राबविण्यात येत असल्यामुळे गळतीचे प्रमाण प्राथमिक व उच्च प्राथमिक मध्ये सातत्याने कमी होत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

**(६२) * १५१७० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये १८ हजारांवर शिक्षकांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९ मध्ये शिक्षक भरती उठविण्यात येऊन आज साडेतीन वर्ष एवढा कालावधी होऊनही अद्यापही शिक्षक भरती झालेली नसून शिक्षक भरती न करण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात शिक्षकांचा तुटवडा असल्याने तातडीने शिक्षक भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) डिसेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) नुसार ७२०३ उमेदवारांची शिफारस करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत १९६ संस्थांमधील ७६९ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) शिक्षक पात्रता परीक्षेमध्ये उत्तीर्ण उमेदवारांची शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी फेब्रुवारी, २०२३ मध्ये आयबीपीएस कंपनीमार्फत घेण्याचे नियोजित आहे.

तसेच राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्यास परवानगी मिळण्याबाबत वित्त विभागाची मान्यता घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण सेवक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत

**(६३) * १५९३५ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार, श्री.किशोर दराडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची मागणी शिक्षण सेवक सातत्याने करीत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आली तसेच किमान वेतन कायदा १९४८ पासून लागू असून समान काम समान वेतन कायदा सुद्धा राज्यात लागू असताना नवनियुक्त शिक्षकांना ३ वर्षे शिक्षण सेवक कालावधीत मानधन दिले जाते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी सेवक व ग्रामसेवक यांच्या मानधनात सहा हजार रुपयांवरुन १६ हजार रुपयांची वाढ होणार असून शिक्षण सेवक यांना रोजंदारीपेक्षा कमी मानधन मिळत आहे, शिपाई पदासाठी १७००, लिपिक पदासाठी रुपये २०००, ग्रंथपालासाठी रुपये २५००, शाळा सहायकाला रुपये २००० मानधन दिले जात असून शिक्षण सेवक, डीएड स्केल शिक्षकांना रुपये ६००० मानधन व बी.एड. स्केल शिक्षकांना रुपये ९००० इतके मानधन दिले जाते तसेच कृषी सेवक व ग्रामसेवक प्रमाणेच शिक्षण सेवक, शिपाई व लिपिक कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने कृषीसेवक व ग्रामसेवकांच्या धर्तीवर शिक्षण सेवक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनातही वाढ करण्याबाबत किंवा शिक्षण सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) शिक्षण सेवक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मानधनात वाढ करण्यासंदर्भात शासनस्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध करून देण्याबाबत

**(६४) * १५७३७ प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर अपुऱ्या सुविधांमुळे आपत्कालीन परिस्थितीत यंत्रणा वेळेत दाखल होत नसल्याने अपघातातील जखमींवर उपचार करण्यास दिरंगाई होऊन मृत्यू ओढवत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या महामार्गांवर पुणे-सातारा महामार्गाच्या लगत अतिक्रमणाचा विळखा पडू लागला असून या अतिक्रमणामुळे ग्राहक आपली वाहने महामार्गावरच उभी करत असल्याने अपघात वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या राष्ट्रीय महामार्गावर आपत्कालीन यंत्रणा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने सुविधा उपलब्ध करून अतिक्रमण हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गाचे काम केंद्र शासनाच्या अखत्यारीत असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे. NHAI Portal वरील Toll Free Help line No. १०३३ वरुन महामार्गावरील गस्त पथकास आवश्यक ते निर्देश दिले जातात. Route Patrolling, रुग्णवाहिका पथक

(Ambulance Team) सर्व आवश्यक त्या उपाययोजनेसह दुर्घटना स्थळी दाखल होते. गरजेनुसार आपत्कालीन परिस्थितीत संबंधित वाहतूक पोलीस विभागाच्या मदतीने त्वरित कारवाई केली जाते व कमीत कमी वेळेत अपघातग्रस्तांना रुग्णालयात हलविले जाते.

(२) हे खरे नाही.

महामार्गावरील अपघात हे वाहनांचा वेग जास्त असल्यामुळे, वाहनांच्या तांत्रिक बिघाडामुळे व चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे झालेले आहेत. पुणे, सातारा हायवेच्या हद्दीतील बरीचशी अतिक्रमणे काढण्यात आली असून उर्वरीत अतिक्रमणे पोलीस यंत्रणेच्या मदतीने काढण्यात येत आहे.

(३) व (४) वरील प्रमाणे आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा (सिनेट) निवडणुकीस विलंब होत असल्याबाबत

**(६५) * १५४३१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा सदस्यांची (सिनेटची) मुदत दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२ रोजी संपुष्टात आली असतानादेखील अद्यापपर्यंत मुंबई विद्यापीठाने निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या नसल्याची बाब दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत दोन महिन्यांपासून मुंबई विद्यापीठात अधिसभा अस्तित्वात नसल्याने विद्यार्थ्यांचे प्रश्न आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तदनुषंगाने विद्यार्थ्यांचे प्रश्न व त्यांच्या हितार्थ योजनांच्या अंमलबजावणीसाठी अधिसभेचे अनन्यसाधारण महत्त्व असल्याने सिनेट निवडणूक प्रक्रिया तातडीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) खरे नाही.

(३) मुंबई विद्यापीठाने सिनेट निवडणूक प्रक्रिया राबविण्याबाबतचे निवडणूकीसंदर्भातील जाहीर प्रकटन दिनांक १४/१०/२०२२ रोजी व जाहीर प्रकटन दिनांक ०९/११/२०२२ रोजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून निवडणूकीबाबतची पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

सदर नियोजन केलेल्या निवडणूक प्रक्रियेनुसार सर्व प्राधिकरणाच्या निवडणूका मार्च, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण करण्यासाठी विद्यापीठांचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेषत: वाळूंज (जि.औरंगाबाद), चाकण (जि.पुणे) येथील उद्योगधंद्यांना मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(६६) * १५९२२ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळूंज (जि.औरंगाबाद) येथे खाजगी गट नं. ६७,६८,७०,७१ मध्ये किमान ७०० लघुउद्योग कार्यरत आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळूंज एमआयडीसी येथे जागा उपलब्ध नसल्याने खाजगी जागेमध्ये उद्योग सुरु करण्यात आले असले तरी उद्योजक शासनास दरवर्षी प्राप्तीकर, जीएसटी व महसूल देत असूनही सदर उद्योगांना औद्योगिक विद्युत वाहिनीने वीजपुरवठा न करता ग्रामीण विद्युत वाहिनीने वीजपुरवठा करीत असल्याने अखंडीत वीज मिळत नसून उत्पादन क्षमता घटल्यामुळे उद्योजकांना भुर्दंड सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाकण (जि.पुणे) येथील एमआयडीसीत गेल्या एक ते दीड वर्षात ३० व पुणे परिसरातील औद्योगिक वसाहतीमधून ७० उद्योजकांनी आपल्या कंपन्या बंद केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या उद्योगधंद्याना खंडीत वीजपुरवठा, वाढती गुन्हेगारी, माथाडी कामगारांची दहशत, रस्ते, वाहतूक कोंडी, अपघात, वीज, पाणी, रस्ते व असुरक्षित वातावरण, अग्निशमन केंद्रासारख्या तातडीच्या पायाभूत सुविधा येथील उद्योगांना वेळेत उपलब्ध होत नाहीत त्यामुळे उद्योजकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने सदर उद्योजकांना औद्योगिक वीज वाहिनीद्वारे वीजपुरवठा व एमआयडीसी कडून मिळणाऱ्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाच्या उद्यम नोंदणी संकेतस्थळानुसार नोव्हेंबर, २०२२ पर्यंत वाळूज (जि.औरंगाबाद) येथील खाजगी गट नं. ६७, ६८, ७०, ७१ मध्ये ३३१ उद्योग कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही. सदर उद्योगांना ११ के.व्ही. स्टोन क्रशर औद्योगिक वाहिनीने वीजपुरवठा केला जात आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र.१, ३ व ४ ही औद्योगिक क्षेत्र विकसीत झालेले आहेत. तसेच चाकण टप्पा क्र.२ मधील बहुतांश पायाभूत सुविधांची कामे पूर्ण झाली आहेत. सद्य:स्थितीत चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र.४ मध्ये भूखंड क्र.AM-१ या ठिकाणी अग्निशमन केंद्र कार्यान्वित असून तेथून चाकण औद्योगिक क्षेत्रातील टप्पा क्र.१ ते ५ या औद्योगिक क्षेत्रामध्ये सेवा पुरविण्यात येतात.

(५) वाळुंज औद्योगिक परिसरातील खाजगी गटांमधील उद्योगांना चांगल्या दर्जाची वीज उपलब्ध करून देणेसाठी सुधारीत वितरण क्षेत्र (RDSS) योजनेमध्ये ३३/११के.व्ही. तीसगाव व साजापूर उपकेंद्रे प्रस्तावित आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लासूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(६७) * १५३२३ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासूर ते गाजगांव मार्ग श्रीक्षेत्र गवळीशिवरा (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) हा १२ कि.मी.चा रस्ता १५ वर्षांपूर्वीच केला असून ह्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने वाहतुकीसाठी अयोग्य झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीक्षेत्र गवळीशिवरा येथे मोठे धार्मिक स्थळ असल्याने येथे भाविकांची मोठी गर्दी असते व वाहनांना जाण्या-येण्यासाठी वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लासूर स्टेशन ते डोणगांव हा रस्ताही पूर्ण खड्डेमय झाला असून तसेच लासूर ते सनव या ३ कि.मी.च्या रस्त्याचीही अत्यंत दुरवस्था झाली असून सनव येथील शेतकरी, विद्यार्थी यांना लासूरला जाण्यासाठी देवगाव मार्गे १० किमी. अंतर पार करुन जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदनुषंगाने उपरोक्त रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) लासूर ते गाजगाव या १२ कि.मी. लांबीमध्ये राष्ट्रीय महामार्ग ७५२ (J) व प्रजिमा-३० वरील रस्त्याची ८ कि. मी. लांबी वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे. इजिमा-५४ ची अतिवृष्टीमुळे ना-दुरुस्ती झालेली ४ कि.मी. लांबीची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे संबंधित जिल्हापरिषदेचे नियोजन आहे.

(२) लासूर ते श्रीक्षेत्र गवळीशिवरा येथे जाण्याकरीता राष्ट्रीय महामार्ग ७५२ (J) व प्रजिमा-३० चौफुलीमार्गे पर्यायी रस्ता उपलब्ध असून सदर रस्त्यांची लांबी वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(३) लासूर स्टेशन ते डोणगांव रामा-२१६ वरील प्रश्नाधीन ८ कि.मी. लांबी मध्ये ५.२ कि.मी. लांबीत डांबरीकरणाची कामे प्रगतीत आहेत. २.८ कि.मी. लांबीत मंजूर कामे निविदा प्रक्रिया पूर्ण करुन हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्य:स्थितीत सदर लांबी वाहतुकीस सुरळीत आहे.

लासूर ते सनव या १० कि.मी. लांबीतील राज्यमार्ग-३९ वरील ७ कि.मी. लांबी वाहतुकीकरीता सुस्थितीत आहे.

उर्वरित ३ कि.मी. लांबीचा रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा असून रस्त्याची दुरुस्ती निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे संबंधित जिल्हापरिषदेचे नियोजन आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्पांतर्गत लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धासाठी मराठी भाषेचा पर्याय उपलब्ध करुन देणेबाबत

**(६८) * १६२६५ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत (एससीईआरटी) राज्यातील सर्व शासकीय शाळांमध्ये राष्ट्रीय लोकसंख्या शिक्षण प्रकल्पांतर्गत लोकनृत्य व भूमिका अभिनय स्पर्धा केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेतून घेण्याची सक्ती केली असून राजभाषा मराठीला मात्र हद्दपार केले असल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू स्पर्धांसाठी प्राधान्याने राजभाषा मराठीचा पर्याय उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
राष्ट्रीय पातळीवर NCERT नवी दिल्ली मार्फत प्राप्त सूचनेनूसार लोकनृत्य स्पर्धा स्थानिक भाषेत तर भूमिका अभिनय स्पर्धा केवळ हिंदी आणि इंग्रजी भाषेतून घेणेबाबत निर्देश आहेत.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भरणे-खेड (ता.खेड, जि रत्नागिरी) रस्त्याच्या रूंदीकरणाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(६९) * १५१५७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भरणे-खेड (ता.खेड,जि.रत्नागिरी) या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या दीड कि. मी. अंतराच्या रस्त्याच्या रूंदीकरणाचे कामास सन २०१६-१७ मध्ये ५ वर्षापूर्वी मंजूरी मिळूनही सदरहू रस्ता अद्यापही अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामास विलंब होत असल्याने या मार्गावर अपघाताच्या घटना घडत असून त्यात नागरिकांना आपले प्राण गमवावे लागले तर अनेक गंभीररित्या जखमी होऊन काहींना कायमचे अपंगत्व आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने सदरहू भरणे-खेड या मार्गाच्या रूंदीकरणाच्या कामास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर मार्गाच्या रूंदीकरणाचे काम पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) राज्य मार्ग १६२ वरील भरणे ते खेड ही १.४२० कि.मी. रस्त्याची लांबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येते. सन २०१६-१७ मध्ये या लांबीपैकी भूसंपादन झालेल्या ०.६०८ कि.मी. लांबीचे चौपदरीकरणाचे मंजूर काम सन २०१९ मध्ये पूर्ण करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्नाधीन रस्त्याच्या लांबीपैकी उर्वरीत ०.८१२ कि.मी. खेड शहरातील दाट वस्तीमधून जात असलेल्या लांबीत रस्त्यालगत इमारतींचे बांधकाम झालेले आहे.

सदर लांबीत रुंदीकरणाचे काम करण्याकरीता प्रथम भूसंपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तद्नंतर निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार रुंदीकरणाचे काम हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुदानित माध्यमिक शाळेतील निवृत्त शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकीसह सुधारित वाढीव निवृत्तीवेतन मिळण्याबाबत

**(७०) * १५६२५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू झाल्यानंतर २०१६ पूर्वी निवृत्त झालेल्या केंद्र सरकारच्या निवृत्तीवेतनधारकांना सुधारित वाढीव निवृत्तीवेतन थकबाकीसह दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य सरकारच्या अनुदानित माध्यमिक शाळेतील निवृत्त शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगानुसार थकबाकीसह सुधारित वाढीव निवृत्तीवेतन मिळालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुषंगाने सहाव्या वेतन आयोगाची थकित रक्कम निवृत्तीवेतनधारकांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) सदर बाब केंद्र शासनाच्या कार्यकक्षेतील आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) दिनांक १/१/२००६ ते दिनांक २६/०२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतन धारकांच्या निवृत्तीवेतनात व कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुऱ्हा-वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील रस्ता कॉंक्रीटीकरणाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(७१) * १५२६६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुऱ्हा-वढोदा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील रस्ता कॉंक्रीटिकरणाचे बांधकाम गेल्या १ वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याने प्रवाशांना वाहतुकीस त्रास होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने संबंधित दोषी असलेल्या ठेकेदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच सदर रस्त्याचे कॉंक्रीटीकरणाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ७५ % काम पूर्ण झाले असून करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे सदरची कामे फेब्रुवारी, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.